
तुमचे इंजिन
सुरू करा
शिक्षक पुस्तक

# तुमचे इंजिन सुरू करा

*तुम्ही आध्यात्मिक शर्यतीसाठी तयार आहात का?*

*1 करिंथ 9:24*




**''चिल्ड्रन आर इम्पॉर्टंट" पासून व्हॅकेशन बायबल स्कूल कार्यक्रम**

**सर्व वयोगटासाठी शिक्षकांची पुस्तके**

**संकेत स्थळ: www.ChildrenAreImportant.com/engines/**

## "चिल्ड्रन आर इम्पॉर्टंट" च्या संपूर्ण चमूचे आभार

संपादक: ख्रिस्टीना क्राउज

सर्जनशिल चमू: अब्रिल पॅलाशियस कमॅचो, अरेली झूरीयल सलीनस सांचेझ, ड्वाईट क्राउज, जेनिफर सांचेझ निइटो, ज्युलीया सांचेझ निइटो, माईक कांगास, मौन्सेरॅट दुरान डाइज, सुकी कांगास, व्हेरोनिका टोज आणि विकी कांगास.

रूबेन डारीओ यांना या कार्यक्रमातील सुंदर संगितासाठी धन्यवाद.

भाषांतर चमू: अनुपमा वानखेडे, अँटन क्लायमक, आराज मम्मदाझादेह, अरोमा पब्लीकेशन्स अँड मिडीया, अर्तूरो ज्युनियर बोरोन, ब्लेसी जेकब, कार्मेला डॉन फ्लोरेस, ख्रिसब्रेसनाहान, डेविड राजू, एफ्राईम नूगूना मिरोबी, ैफिनी जेकब, गिनव, हमिदरेझा अझिमी (hamid.azimi1364 at gm#ail com), हेऑडरी, I-clever.com, इक्बालमन, जेकब कुरूविला, कामिलतूर्क, करूणगुरू वांगी, किरण, मैत्रेय मंडल, मार्को चू, मार्कोस रोचा, मॅथ्यू दास, मितेश मंडालिया, मिसेस गिताश्री नवनिता कृष्णन, नासिम बौगताइया, निकबेंक, पाॅल वांगी, पॉल सेपटाॅन, रूबिना राय, सफदर खान, शहरोषण 15, टॅलेंटो उनिडो, उइरिटोम, व्हर्दिया ज्युलियनस्या, येच ज्यूंग चीन, झेईना बर्झागा आजेस्निबीया .







# व्हीबीएस मध्ये आपले स्वागत आहे

# तुमचे इंजिन्स सुरू करा

पवित्र शास्त्राप्रमाणे, ख्रिस्तासोबतची आपली वाटचाल ही केवळ निष्क्रीय घटना नाही, ती एक शर्यत आहे! आपण आणि लेकरांनी जिंकण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे आणि ही शर्यत जिंकल्यामुळे या जगात आपल्याला या जगामध्ये छानसा करंडक मिळणार नाही, जो फिका पडेल किंवा कपाटात हरवला जाईल, परंतु सार्वकालीक पारितोषिक मिळणार आहे.

*"शर्यतीत धावणारे सर्वच धावतात पण एकालाच बक्षिस मिळते हे तुम्हाला ठाऊक नाही काय? असे धावा की तुम्हाला ते मिळेल . स्पर्धेत भाग घेणारा प्रत्येक जण सर्व गोष्टीविषयी इंद्रियदमन करितो; ते नाशवंत मुगूट मिळविण्यासाठी असे करितात, आपण तर अविनाशी मूगूट मिळविण्यासाठी असे करितो."*
*1 करिंथकरांस पहिले पत्र 9:24-25*

जर आपण आटोकाट जोर लावला आणि आपल्या सर्वस्वानिशी येशूला अनुसरलो तर आपल्याला सार्वकालीक पारितोषिक मिळणार आहे. या उत्साही आणि वेगवान व्हीबीएसमध्ये आपल्या येशू ख्रिस्तासोबतच्या जीवनाची तूलना म्हणून आपण मोटार सायकल शर्यत पाहाणार आहोत.

कोणत्याहि इंजिन असलेल्या वाहनाप्रमाणे, शर्यतीमध्ये भाग घेण्यासाठी मोटार सायकल चांगल्या स्थितीत असणे आवश्यक असते. इंजिनला काम करण्यासाठी तेलाची गरज असते, नाहीतर ते नाश पावेल! त्सेच, येशूचे अनुयायी या नात्याने, आपण आपल्या चूका मानल्या पाहिजेत आणि जेव्हा आपण काहीतरी वाईट करतो तेव्हा आपल्याला दुखः झाले पाहिजे. नेमलेल्या रस्त्यावरून अतिशय वेगाने जाण्यासाठी मोटार सायकलला नविन टायरची गरज असते. तसेच आपल्या जीवनामध्ये येशुला अनुसरण्यासाठी आपण आज्ञापालन केले पाहिजे. जसे इंजिन थंड राहावे म्हणून थंड ठेवणारे उपकरण आवश्यक असते, आपण आपल्या जीवनामध्ये इतरांवर प्रेम केले पाहिजे, आपल्या ख्रिस्तामधील भावांसोबत मतभेद आणि संघर्ष टाळला पाहिजे. जशी मोटार पेट्रोलशिवाय काहीहि करू शकत नाही, तसेच ख्रिस्ताच्या सामर्थ्याशिवाय आपण काहीहि करू शकत नाही. आणि शेवटी, मोठया मोटार सायकल शर्यतीमध्ये ठराविक जागी लोकांची चमू असते जी मोटार सायकलची देखभाल करते आणि शर्यतीच्या दरम्यान तिला योग्य त्या स्थितीत ठेवते. पर्यवेक्षक त्या चमूचा अधिकारी असतो जो केवळ गाडीच्या मेकॅनिकची तपासणी करतो असे नाही तर शर्यतीवर लक्ष देतो आणि चालकाला अडथळयांपासून दूर राहण्यासाठी मदत करतो. शर्यतीच्या मुख्य व्यक्तीप्रमाणे, येशू ख्रिस्त या सर्व गोष्टींची काळजी घेतो आणि आपल्या चमूचा पुढारी म्हणून आपले मार्गदर्शन करतो.







तुम्ही आणि तुमची व्हीबीएस चमू ''गराज क्राफ्ट'' या स्टेशनपासून संकल्पना घेऊन कार्यक्रमाची सुरूवात करू शकता, ''तयार, पळा, खेळ'' या स्थानकावरून खेळ कसे घ्यावेत हे शिकू शकता, फराळ करण्यासाठी फराळ थांब्याची मदत घ्या, आणि विद्याथ्र्यांसाठी पुस्तके चालक वर्गातील गमतीदार उपक्रम आणि कोडे सोडवून घेवू शकता. नाटकाच्या वेळी यांत्रिकाची भेट घ्या. गमतीदार धडे शिकवा आणि शर्यतीची तूलना पवित्र शास्त्रातील गोष्टींसोबत करा आणि हावभाव भाषेतून शब्द शिका आणि लेकरांसाठी ते मनोरंजक करा. लेकरांचे स्वारस्य वाढविण्यासाठी लक्ष वेधून घेण्यासाठी नविन पध्दती वापरा आणि कृतिपर गाणे विसरू नका! हे व्हीबीएस सुवार्ताप्रसाराचे मोठे साधन आहे, म्हणून जास्तीत जास्त लेकरांना आपल्या व्हीबीएस मध्ये आमंत्रित करा. धडा 5 मधील गोष्ट येशूचे वधस्तंभावरील मरण आणि तारण याबाबत आहे. येशूचा आपला प्रभू आणि तारक म्हणून स्विकार करण्यासाठी लेकरांना आमंत्रण देण्यास विसरू नका!

"तर मग आपण एवढ्या मोठ्या साक्षीरूपी मेघाने वेढलेले आहोत म्हणून आपणही सर्व भार व सहज गुंतवणारे पाप टाकून, आपल्याला नेमून दिलेल्या धावेवरून धीराने धावावे" *इब्री लोकांस पत्र12:1*

देव तुम्हाला भरपूर आशीर्वाद देवो जेव्हा तुम्ही लेकरांना नम्रता, आज्ञापालन आणि प्रेमाने येशूच्या मागे जाण्यास सांगता, येशूला आपल्या चमूचा कर्णधार ठेवता . आम्ही प्रार्थना करतो की पुष्कळ लेकरे ख्रिस्ताला ओळखतील आणि पूर्ण चर्चसाठी ते आशीर्वादाचे कारण होईल . झूम झूम!



चिल्ड्रन आर इंपाॅर्टंटच्या सर्जनशिल चमूकडून तुम्हाला खूप आशीर्वाद!







# ह्या व्हीबीएसचा उपयोग कसा करावा

## केवळ संचालकासाठी

तुम्ही या कार्यक्रमाचे संचालक असल्यामुळे आम्ही तुम्हाला सूचवितो की तुम्ही इतर चमू किंवा वर्गाचे पुढारी होउ नये, परंतु इतर लोकांना त्या कामाची जबाबदारी द्या. जेव्हा हरवलेल्या सामग्रीबाबत समस्या निर्माण होतील, लेकराचा अपघात होईल, हरवलेले शिक्षक किंवा पाळकांसोबत बोलण्याची गरज भासेल, तर या गोष्टी संचालक म्हणून तुम्हाला हाताळाव्या लागतील. तुम्ही तुमचे काम जसे केले पाहिजे तसे करू शकणार नाही, जर तुम्ही मुख्य संदेश सुध्दा द्याल किंवा फराळ बनवाल. सर्व मनोरंजक गोष्टी तुमच्या चर्चमधील बंधुसाठी सोडून द्या.

## स्वःयंसेवक

व्हीबीएस मध्ये तुमची मदत करणारे लोक शोधणे हे संडेस्कूलमध्ये मदत करणारे शोधण्यापेक्षा सोपे आहे, कारण व्हीबीएस केवळ एका आठवडयाचे असते. पुष्कळ स्वःयसेवकांना सामिल करण्याचा प्रयत्न करा, कारण असे केल्यामुळे मंडळी उत्तेजित होईल. कर्मचारी करू शकतील अशी कामे शोधा. ते केल्यानंतर, तुमची मदत करण्यासाठी योग्य ते कौशल्य असलेल्या लोकांचा विचार करा. असे लोक निवडा जे लेकरांवर प्रीती करतात, ज्यांच्यावर विसंबून राहाता येते आणि जे आपल्या चारीत्र्यासोबत सहमत आहेत. पुढील गोष्ट आहे की सरळ त्यांच्याकडे जा आणि व्हीबीएस मध्ये निश्चीत असे काम करण्यासाठी त्यांना आमंत्रण द्या. त्यांनी तुमच्यासोबत शेजारच्या लेकरापर्यंत ख्रिस्तासाठी पोहोंचावे यासाठी त्यांना दृष्टांत सांगा. जर त्यांना व्यक्तीगतरीत्या आमंत्रण दिले तर लोक आपला वेळ आणि शक्तीनिशी सहभागी होतात.

## प्रार्थना

तुमच्या व्हीबीएस चे नियोजन प्रार्थनेने सुरू करा. देवाजवळ जाण्यासाठी वेळ घ्या, तुम्ही कार्यक्रम ठरवित असतांना त्याचे मार्गदर्शन मागा. आठवडा जवळ येत असतांना तुमच्या जवळच्या मित्राला प्रार्थना करण्यास सांगा. तुमची चमू एकत्र जमवा आणि तुमच्या पाळकांसोबत प्रार्थना करा.

- व्हीबीएस चालू असतांना जे प्रार्थना करतील असे लोक शोधा.
- व्हीबीएस ही तुमच्या चर्चमधील लेकरांना शिकण्याची मोठी संधी आहे आणि ते एक सुवार्ता हत्यार सुध्दा आहे. या कार्यक्रमासाठी प्रार्थनेच्या महत्वाला कमी लेखू नका.

“*नीतीमानाची प्रार्थना कार्य करण्यास फार प्रबळ असते*” (याकोब 5:16)

## प्रशिक्षण

व्हीबीएस मध्ये सहभागी होणा-या सर्वांसाठी प्रशिक्षण वर्गाची आखणी करा. त्या दिवशी तुम्हाला तपशीलवार हे स्पष्ट करता येईल की कार्यक्रम कसा कार्यान्वित होईल आणि तुम्ही प्रत्येकाला त्यांच्या जबाबदा-या वाटून द्याल.







## तारीख आणि जागेची निवड करणे

चर्चच्या दिनदर्शिकेप्रमाणे योग्य ती तारीख निश्चीत करा. तुमच्या पाळकांसोबत तुम्ही सहमत झाल्यावर तुमच्या वस्तीमधील इतर उपक्रम त्याच वेळी होणार नाहीत हे तपासून पाहा. व्हीबीएस तुमच्या चर्चमध्येच घेतले पाहिजे असे काही नाही. जास्त लेकरे यावीत म्हणून तुमचे व्हीबीएस तुमच्या शेजारी असलेल्या बागेत धेणे हा एक पर्याय असू शकतो. तुम्ही जागेची निवड केल्यानंतर लक्षात ठेवा की सजावट करण्यासाठी आणि जागेची स्वच्छता करण्यासाठी तुम्हाला काही वेळ बाजूला काढावी लागेल. हा कार्यक्रम 5 दिवसीय व्हीबीएससाठी लिहीण्यात आला आहे. तुमची इच्छा असेल तर तुम्ही 1,4,आणि 5 व्या दिवसाचा कार्यक्रम वापरून तीन दिवसाचं व्हीबीएस घेउ शकता. सामग्री तुमच्या सेवेसाठी तयार करण्यात आली आहे, काटेकोरपणे नियम पाळण्यासाठी तयार करण्यात आलेली नाही.

## जाहीरात करणे

कार्यक्रमाआधी 4-6 आठवडे जाहीरात करण्यास सुरूवात करा. पुलपीटवरून त्याची उद्घोषणा करण्यात येईल हे निश्चीत करा आणि वस्तीतील लेकरापर्यंत पोहोंचण्याचा दृष्टांत पेरण्यात आला आहे याची खत्री करा.

• सुटीतील शाळा ही सुवार्ताप्रसाराची पहिली चांगली पायरी आहे, कारण लेकरंासोबत चर्चला येण्यास कदाचित लोकांना भीती वाटेल, परंतु आपल्या लेकरांना सुटीमधील एका आठवडयाच्या कार्यक्रमास पाठविण्यामध्ये कोणाला अडचण वाटत नाही. याकडून कुटूंबाला भेट देण्याचा दरवाजा उघडला जातो, आणि शिवाय आपली लेकरे काय करीत आहेत हे पाहण्यासाठी पालकहि उपस्थित राहू शकतात. याकडून मंडळीला विचार करता येतो की कोणत्या कुटूंबाला आमंत्रण द्यावे.

• जाहीरात करण्यासाठी लोकांना आमंत्रण द्या, निमंत्रण पत्रिका वाटणे, माहिती वाटणे यामध्ये त्यांना सहभागी करा. तुमच्याकडे पुरशी जाहीरात सामग्री आहे याची खात्री करा.

• वेगवेगळया जागी जाहीरात फलक लावा (दुकान, लोक जमतात अशा जागा). तुम्ही स्पर्धा सुध्दा आयोजित करू शकता की कार्यक्रमाला कोण जास्तीत जास्त पाहूणे धेउन येईल (बक्षिस म्हणून तुम्ही त्यांना चांगले जेवण देवू शकता किंवा दुसरे काही बक्षिस देवू शकता).

## नोंदणी

कार्यक्रमाच्या अगोदर नोदंणी करण्यासाठी उत्तेजन द्या . यामुळे तुम्हाला हजर राहणा-यांची अंदाजे संख्या समजेल आणि तुम्ही प्रत्येकासाठी पुरेशी सामग्री राहावी म्हणून नियोजन कराल. काळजीपूर्वक केलेल्या नोदी तुम्हाला लेकरांची आणि कुटूंबाची यादी ठेवण्यासाठी मदत करतील यासाठी की भविष्यात असे कार्यक्रम करता यावेत.







## बदलणारी स्थानके

हे व्हीबीएस तुम्ही तुमच्या आवडीप्रमाणे वापरू शकता, परंतु तीन स्थानकांचा आलटून पालटून उपयोग करण्यासाठी हा कार्यक्रम तयार करण्यात आलेला आहे. म्हणजे तुम्ही विद्यार्थी तीन गटामध्ये विभागावेत, आणि ते तीन गट प्रत्येक स्थानकावर फिरतील, जरी प्रत्येक स्थानक एकाच विभागात आहेत. प्रत्येक स्थानकावर 20 ते 40 मिनीटे घालवावी लागतील आणि प्रत्येक स्थानकाची तीन वेळा पुन्हा येईल, यासाठी की प्रत्येक गट दिवसातून एकदा प्रत्येक स्थानकावर जावेत. लेकरांची विभागणी करण्याचा सोपा मार्ग म्हणजे त्यांना वयाप्रमाणे विभागणे, आणि त्यामुळे विद्यार्थ्यांच्या पुस्तकासाठी सुध्दा मदत होते:

- सोपे (4-6 वर्षे)
- माध्यमिक (7-9 वर्षे)
- कठीण (10-12 वर्षे)

जर वयाने मोठे असलेली मुले व्हीबीएस मध्ये भाग घेत असतील तर, आपल्याकडे आणखी एक प्रगतीशील वयोगट आहे (13 अधिक). तुम्ही प्रत्येक गटात असलेल्या संख्येप्रमाणे गटांना प्रत्येक स्थानकावर जाता येईल याप्रकारे विभाजीत करू शकता किंवा केवह वर्ग आणि हस्तकाम स्थानके ठेवू शकता आणि दिवसाच्या शेवटी खेळ घेवू शकता




स्थानक बदलतांना जेव्हा वेळ होते तेव्हा संगीत वाजविने ही आमची आवडती पध्दत आहेए जेणे करून विद्यार्थी एका स्थानकापासून दुस-या स्थानकावर जातांना भरपूर उर्जा राहिल. स्थानकांचा उपयोग करण्याचे सौदर्य हे आहे की शिक्षकांना ज्यास्त गोष्टींची तयारी करावी लागत नाहीए परंतू ते वर्गाचा एक भाग तयार करतात आणि त्याची ३ वेळेस पुनरावृत्ती करतात. (प्रत्येक शिक्षकासाठी ते थोडे कमी काम आहे.)

## चक्राकार कार्यक्रम

सर्वजण एका गटामध्ये:

- सुरुवात
- संगीत
- नाटक
- मुख्य संदेश
- सुरुवातीचा खेळ
- पवित्र शास्त्रीय धडे

चक्राकार स्थानके:

- विद्यार्थी पुस्तके उपक्रम
- दिवसाचे हस्तकाम
- खेळ (किंवा सर्वांसोबत शेवटी खेळ खेळा)

सर्वजण एका गटामध्ये:

- फराळ
- संगीत
- स्मारोप




## पारंपारीक कार्यक्रम

सर्वजण एका गटामध्ये

- आरंभ
- संगित
- नाटक
- मुख्य संदेश
- थंडावा दूर करणारा खेळ

वर्गातील वेळ

- पवित्र शास्त्रीय धडा
- विद्यार्थी पुस्तके
- हस्तकाम
- फराळ

खेळण्यासाठी एकत्र येणे

सर्वजण एका गटामध्ये:

- संगित
- समारोप

## थंडावा दूर करणारे खेळ

थंडावा दूर करणारे खेळ हे लहान खेळ आहेत जे तुम्ही फावल्या वेळी आपल्या विद्यार्थ्यांसोबत खेळू शकता. त्याकडून विद्यार्थ्यांना एकत्र मिसळण्यासाठी आणि गटामध्ये एकमेकांसोबत जोडले जाण्यासाठी मदत होते. या खेळांकडून उत्तेजन देण्याकडून आणि सहभागाद्वारे शिकविण्यामध्ये सुधारणा सुध्दा होवू शकते. ते खेळ अभ्यासासाठी आणि लहान गटातील चर्चेसाठी सकारात्मक प्रोत्साहन पूरवू शकतात:

• नविन गटाला एकमेकांची ओळख करून देण्यात मदत करणे

• नविन सभासदांना गटामध्ये सामिल होण्यासाठी मदत करणे

• तरूण लोकांना एकत्र असण्यामध्ये आश्वस्त वाटण्यासाठी मदत करणे.







• सहकार्यास प्रोत्साहन.
• दुस-यांचे ऐकण्यासाठी प्रोत्साहन.
• एक चमू म्हणून काम करण्यासा प्रोत्साहन.
• तरूण लोकांनी आपली चैकडी सोडून द्यावी म्हणून प्रोत्साहन.
• सामाजिक कौशल्य विकास
• पुढा-यांसोबत संबंध बांधणे
• शिकण्यासाठी आणि सहभागासाठी चांगले वातावरण निर्माण करणे

तुमच्या विद्यार्थ्यांना मुख्य संदेश ऐकल्यावर लगेच पवित्र शास्त्रातील गोष्ट ऐकण्यामध्ये रूची वाटणार नाही! बोलणे आणि उपदेश यांचा तो जास्तीचा काढा आहे. प्रत्येक धडयामध्ये आम्ही “बोलणे” थंडावा दूर करणा-या खेळासोबत जोडले आहे. या खेळांचा उपयोग तुमच्या विद्याथ्र्यांना लक्ष देण्यास मदत व्हावी आणि प्रत्येक दिवशी त्यांनी धडा शिकावा, यासाठी करा.

## खेळ

या साहित्यामध्ये शालेय लेकरांसाठी प्रत्येक धडयासाठी दोन खेळ देण्यात आलेले आहेत. एक खेळ रिलेप्रमाणे चमूने खेळावयाचा आहे आणि दुसरा खेळ व्यक्तीगत आहे, ज्यामध्ये लेकरे एकटयाने खेळतात आणि एक जण विजयी होतो. तुम्ही खेळांचा उपयोग व्हीबीएसमध्ये मजा यावी म्हणून करू शकता, यासाठी की प्रत्येक दिवशी लेकरांना रोज व्हीबीएसमध्ये यावेसे वाटेल. जर तुम्हाला आवड असेल तर तुम्ही गट तयार करू शकता आणि जी चमू जिंकेल तिला गूण देवू शकता.







# आणखी काही कल्पना

## दरवाजा सजविणे

तुमच्या वर्गषोलीचा दरवाजा सजवा जो वर्ग सुरू करण्यासाठी शेवटचे टोक असेल, किंवा तुमच्या वर्गातील प्रत्येक मुलाचे प्रतिनिधीत्व करणा-या मोटार सायकलने दरवाजा सुशोभित करा . तुम्ही दरवाजा सजविण्यासाठी बांधकाम किंवा दुसरा विशेष कागद वापरू शकता






## रहदारी दिवे

तुम्ही स्वतः हे करू शकता.
तुम्हाला केवळ याची गरज भासेल:

- पुठ्ठ्याचा खोका
- काही रिकामे डब्बे
- आधारासाठी काठी





## कागदी पडदे

कागदी पडदे दारावर किंवा खिडक्यांवर लावा



## फूगे

वर्गखोली वेगवेगळया फूग्यांनी सजवा जसे की कोन, रहदारी दिवे, टायर किंवा कमान, शर्यतीच्या मैदानावर आहात असे वाटेल.






## कागदी गोल

तुम्हाला आवडणारे रंग किंवा आराखडयांचा वापर करून वेगवेगळया आकारामध्ये कागदी गोल तयार करा







## रस्ता चिन्हे

याकडून खूप मजा येईल आणि परिपूर्ण वातावरण निर्माण करण्यासाठी मदत होईल




## ध्येय स्वःय फोटो

लेकरांचे फोटो काढण्याची ही एक उत्कृष्ट संधी आहे.




## मोटार सायकल

तुम्ही केवळ पुठ्ठयांचा वापर करून मोटार सायकल तयार करू




## टायर्स

जुन्या टायर्समध्ये काहीतरी टाकून तुम्ही त्यांना सुशोभित करू शकता





# 1 माझे पाप पदरी घेणे

पवित्र शास्त्रातील गोष्ट: पेत्र पश्चाताप करतो / मत्तय 26:69-75, योहान 21



## वचन

“जर आपण आपली पापे पदरी घेतली, तर तो विश्वसनीय व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अनीतीपासून शुद्ध करील.” 1 योहानाचे 1:9

## नाटक

**खोटे बोलणारा मॅकॅनिक**

- मॅकॅनिक प्रवेश करतो, कापडाच्या तुकडयाने त्याच्या हातावरील वंगण काढतो आणि फार जोराने हसतो. तो सोफ्यावर बसतो आणि मद्यपान करू लागतो. आपले जीवन कसे आहे हे तो लेकरांना सांगतो: तो फार चांगला मॅकॅनिक आहे ज्याला ग्रीसी म्हणतात. तो लेकरांना हे सुध्दा सांगतो की त्याला एक सुंदर पत्नी आहे, चांगली परंतू बंडखोर मुलगी आहे, फार छान आणि आज्ञाधारक कुत्रा आहे, आणि आपण कुठे राहातो याबाबत सांगतो. (तुमच्या क्षेत्रातील शहराचा उल्लेख करा)

**लक्ष वेधक**

वक्ता: “ही शर्यतीची वेळ आहे

लेकरे: बीप! बीप! बीप! (प्रत्येक बीपला मूठ हातावर आदळावी) “ऊऊऊ (हात खाली करावेत आणि तीन वेळा ऊऊ म्हणावे) . “ये” (हात थोडेसे मोडावे आणि मागे करावे जणूकाय मोटार सायकल चालवत आहे)

- तो पुन्हा हसू लागतो, तो फार आनंदी आहे, म्हणून आपण आनंदी का आहोत हे तो लेकरांना सांगू इच्छितो. दहा दिवसापूर्वी काहीतरी घडले, गि-हाईकाने तेल बदलण्यासाठी आपली गाडी आणली. त्याला नविन तेल देण्याऐवजी, उत्तम आणि सर्वात महाग, त्याने त्याला वापरलेले आणि वाया गेलेले तेल दिले. त्याला असे वाटले की त्या माणसाला हे समजणार नाही आणि त्याला जास्त पैसे मिळतील
- त्या क्षणी, गि-हाईक प्रवेश करतो, रागात आहे आणि मॅकॅनिककडे धाव घेतो, त्याला चांगला चोप देण्यास तो तयार आहे. मॅकॅनिक उडी मारतो आणि सोफ्यामागे लपतो. दोघेजण लेकरांसमोर पळतात, लढाई, किंचाळी, मॅकॅनिक सांगतो त्याने काही चूकीचे केले नाही.
- किंचाळी फोडणारा गि-हाईक मॅकॅनिकला सांगतो की सकाळी त्याचे इंजिन बंद पडले आणि तपासल्यावर सर्वांनी त्याला सांगितले की खूप दिवसापासून तेल बदलेले नाही. गि-हाईक आग्रहाने सांगतो की त्याने तेल बदलेले आहे, परंतु कोणीहि विश्वास ठेवला नाही कारण तेल फार जूणे होते. तो मनुष्य मॅकॅनिकला ओरडून सांगतो की त्याने गाडीमध्ये नविन इंजिन टाकावे. दोधेजण आरडाओरड करत पळून जातात. एक शिक्षक येतात आणि म्हणतात, “शेवट काय होतो हे आपण नंतर पाहाणार आहोत”.







• कोणीतरी एक फलक धेवून समोरून जातो, ज्यावर लिहीले आहे, "नंतर" आता मॅकॅनिक पश्चातापी अंःकरणाने प्रवेश करतो, गि-हाईकासोबत बोलतो. ग्रीसी कबूल करतो की त्याने वापरलेले तेल वापरले आणि तो गि-काईकाची क्षमा मागतो. त्याने केलेल्या वाईट गोष्टीच्या बदल्यामध्ये तो गि-काईकाला नविन इंजिन देण्याचा प्रस्ताव समोर करतो.

• गि-हाईक विनंती स्विकारतो आणि मॅकॅनिकला क्षमा करतो. ते चालतात आणि एकमेकांना अलिंगण देतात. मॅकॅनिक आपल्या नविन मित्राच्या पाठीवर थाप मारतो आणि गि-हाईक मॅकॅनिकच्या पाठीवर अधिक जोराने थाप मारतो. थोडासा चिंतीत होउन, मॅकॅनिक त्याला अधिक जोराची थाप देतो, आणि मग गि-हाईक त्यापेक्षाहि जोराची थाप मारून उत्तर देतो. दोघेजण हसू लागतात आणि निघून जातात

## संदेश

लेकरांनो, या विशेष व्हीबीएसच्या सुरूवातीला तुमचे स्वागत आहे, "तुमचे इंजिन सुरू करा."

आज आपण इंजिनमधील तेलाचे महत्व याबाबत पाहाणार आहोत. मोटार सायकल किंवा कारमध्ये तेल फार महत्वाचे आहे, कारण जर तूम्ही तेलाशिवाय गाडी चालविली, तर तुम्ही पूर्ण इंजिन खराब कराल! यामुळे तुम्ही पूर्णपणे थांबून जाल. पूर्ण इंजिन गमावणे ही फार दुःखाची बाब असते, कारण तुम्हाला केवळ तपासावयाचे होते की गाडीमध्ये पूरेसे तेल आहे का. इंजिनमधील तेल कालांतराने घाण आणि घाण होत असते, नंतर वेळ येते की आपल्याला तेल बदलावे लागते आणि गाडीमध्ये नविन तेल टाकावे लागते. वेळोवेळी तेल तपासा, कधीकधी तुम्हाला जास्त तेल विकत ध्यावे लागेल, परंतु तुम्ही वेळ आणि पैसा वाचवाल, जो तुम्ही गाडीतील तेल संपल्यावर आणि इंजिन खराब झाल्यावर खर्च कराल.




मोठया पापात पडणे हे आपल्या कारचे इंजिन खराब होण्यासारखे आहे. पुष्कळ पापांचा परिणाम फार मोठा होतो, जरी देव त्या पापांची क्षमा करतो. काही पापांमुळे तुम्हाला मोठया कालावधीसाठी तुरूंगात जावे लागेल, काही पापांमुळे तुमचे कुटूंब तुम्हाला लाथ मारून घराच्या बाहेर काढेल आणि काही पापांमुळे तुम्हाला शाळा सोडावी लागेल. अशा प्रकारच्या महाग चूका टाळण्याचा चांगला मार्ग म्हणजे नेहमी त्या पदरी घेण्यास तयार असणे की मी चूकलो, मग चूक कितीहि लहान असो.

कोणालाहि हे मान्य करायला आवडत नाही की त्यांनी काहीतरी चूक केली आहे. हे आपल्या मानवी स्वभावामध्ये आहे की आपण नेहमीच बरोबर आहोत आणि आपण कधीहि चूक करीत नाही. परंतु हे सत्य नाही. आपण नेहमीच चूका करतो, काही चूका दुस-या चूकांपेक्षा मोठया असतात. आज आपण पवित्र शास्त्रातील एका मनुष्याबद्दल पाहाणार आहोत, पेत्र, ज्याने चूक केली. तो पाप करतांना पकडला गेला, आणि जर त्याने तसे करणे चालू ठेवले असते तर त्याने आपले जीवन बरबाद केले असते.

त्याउलट, पेत्राने देवासमोर आपली चूक स्विकारली. या कृतिमुळे त्याला जीवनाच्या शर्यतीमध्ये परतता आले आणि त्याला धावेवर पुन्हा येता आले. पेत्र देवाचा सामथ्र्यवान मनुष्य बनला. देव तुमच्यावर प्रीती करतो आणि त्याच्याकडे तुमच्या जीवनासाठी विशेष योजना आहे. त्याची अशी इच्छा आहे की तुम्ही त्याच्यामध्ये तुम्ही सामथ्र्यशाली मनुष्य किंवा स्त्री व्हावे, अगदी तसेच जसा पवित्र शास्त्रातील पेत्र झाला.







परंतु तुम्हाला आणि मला ही शर्यत जिंकण्यासाठी, आपल्याला पेत्रापासून धडा घेतला पाहिजे, आपण चूक करतो तेव्हा ती स्विकारली पाहिजे आणि पश्चाताप केला पाहिजे. जिकण्यासाठी, आपण स्विकारले पाहिजे की आपण खरोखर चूकलो आहोत आणि आपण परिपूर्ण नाही. मग आपण आपली पातके देवासमोर कबूल करावी. तो आपल्या पापांची क्षमा करील आणि आपल्याला शुध्द करील, जे देवासाठी शुध्द राहाणे आणि त्याच्या मागे चालणे कितीतरी सोपे करते. परंतु आपण परिपूर्ण नसल्यामुळे आपण पुन्हा पाप करतो आणि प्रक्रिया पुन्हा सुरू करतो. ज्याप्रमाणे मोटार सायकलला नेहमी नविन तेलाची गरज असते, तुम्हाला आणि मला सुध्दा देवासमोर आपली पदरी घेण्याची गरज भासेल. ही एकवेळा करण्याची गोष्ट नाही, परंतु ती सतत करण्याची गोष्ट आहे जी आपण स्विकारली पाहिजे जर आपल्याला शर्यत जिंकायची असेल. मी तारणाबाबत बोलत नाही की ते वारंवार झाले पाहिजे, परंतु आपण चूकलो हे कबूल करणे याबाबत मी बोलत आहे. ही सवय तुमच्या इंजिनमधील "तेल" स्वच्छ ठेविले आणि तुम्ही जीवनाच्या शर्यतीमध्ये पुढे जाल!

## थंडावा दूर करणारे खेळ

**फळाची नाराज टोपली**

थंडावा दूर करणा-या या खेळाचा उद्देश व्हीबीएसमध्ये उपस्थित असणा-या विद्याश्र्याची नावे जाणून घेणे हा आहे; आणखी चांगली कल्पना ही आहे की यामध्ये व्हीबीएसमध्ये भाग घेणा-या सर्व लोकांची नावे सामिल करावी. लेकरांना रांगेमध्ये बसवा आणि मग हा खेळ खेळण्यामध्ये कमी त्रास होईल.

रांगेमधील प्रत्येक विद्यार्थी मोठया आवाजात आपले नाव घेईल. पहिल्या आणि शेवटच्या रांगेने नावांकडे बारकाईने लक्ष दिले पाहिजे. शिक्षक सहभागी विद्याश्र्याला फळाचे नाव घेण्यास सांगेल जसे की संत्री, लिंबू, कॅंटेलोप, कलिंगड किंवा फळाची टोपली. सहभागी विद्याश्र्याने, फळ दाखविल त्याप्रमाणे, आपल्या जोडीदाराचे नाव ध्यावे.

**उदाहरण:**

संत्री: तुमच्या उजव्या बाजूला असलेल्या भिडूचे नाव.
लिंबू: तुमच्या डावीकडे असलेल्या भिडूचे नाव.
कँटेलोप: तुमचे स्व:ताचे नाव ध्या.
कलिंगड: तुमच्या समोर असलेल्या मुलाचे नाव ध्या.
फळांची टोपली ' सर्वजण जागा बदलतात.
तुम्ही ओळीमध्ये फिरून विद्यार्थी किंवा सहभागी कर्मचा-याकडे बोट दाखवू शकता. सर्वात जास्त गंमत त्यामध्ये आहे जेव्हा, "फळाची नाराज टोपली" असे म्हटले जाते आणि त्यामुळे सर्वांना जागा बदलावी लागते.


## पवित्र शास्त्रीय धडा

**पेत्र पश्चाताप करतो**










1. पेत्र प्रभू येशूचा शिष्य होता, त्याचा अर्थ असा आहे की तो अशी व्यक्ती होता जो येशूपासून शिकण्यासाठी त्याच्यामागे चालत होता. येशूने आपल्या शिष्यांना सांगितले, "माझ्यामागे या". पेत्र येशूवर फार प्रेम करीत होता. तो पहिला शिष्य होता ज्याने येशूला सांगितले, "तू देवाचा पूत्र आहेस." *शिष्य शब्द बोलतांना आपले हात बंद करा, ते समोर ठेवा आणि खाली करतांना उघडा.*



2. आपल्या शिष्यांसोबत 3 वर्षे राहिल्यानंतर येशूने त्यांना सांगितले की त्याला अटक करण्यात येईल आणि मारण्यात येईल. येशूने आपल्या शिष्यांना सांगितले की ते पळून जातील आणि म्हणतील की आम्ही येशूला ओळखत नाही. पेत्र उभा राहिला आणि म्हणाला, "आम्ही असे कधीच म्हणणार नाही की आम्ही तुला ओळखत नाही." *कधीच नाही शब्द बोलत असतांना तुमचे हात अर्धवर्तूळामध्ये वळवा आणि ते उजवीकडे न्या.'*



3. येशूने सांगितल्याप्रमाणे तीन गोष्टी झाल्या. शिपाई आले आणि त्यांनी येशूला पकडले. सर्व शिष्य पळून गेले परंतु पेत्र येशूचे काय होणार हे पाहण्यासाठी दुरून मागेमागे चालत होता. जेव्हा येशूची मुख्य याजकाच्या वाडयामध्ये चैकशी होत होती, फार थंडी असल्यामुळे पेत्र बाहेर शेकोटीजवळ बसून स्वःताला गरम करीत होता, तेव्हा अचानक एक नोकर मुलगी म्हणाली, "तू येशूसोबत होता," तेव्हा पेत्राने उत्तर दिले, "तू कशाविषयी बोलत आहे हे मला ठाउक नाही." दुस-या एका मुलीने एका व्यक्तीला जोरात सांगितले, "हा येशूच्या शिष्यांपैकी एक होता." आणि पेत्राने उत्तर दिले, "मी त्याचा शिष्य नाही."(जरी त्याने नुकतेच म्हटले होते की मी तुला कधीच नाकारणार नाही). काही क्षणानंतर एक जण म्हणाला, "मला खात्री आहे तू त्याच्या शिष्यांपैकी एक आहेस, कारण तू गालीली आहेस. पेत्र काही वाईट शब्द बोलला आणि मग म्हणाला, "तू काय म्हणतोस हे मला माहित नाही."

*"मला माहित नाही" तुमच्या उजव्या हाताची कपाळावर ठेवा आणि त्यांना वर घ्या.*




4. तेव्हाच कोंबडा आरवला; पेत्राला तेव्हा आठवले की येशूने त्याला काय सांगितले होते, "आज कोंबडा आरवण्यापूर्वी तीन वेळा तू मला नाकारशील." पेत्राने रडायला सुरूवात केली, कारण इतर शिष्यांच्या उपस्थितीत तो म्हणाला होता की मी त्याला ओळखत नाही असे तो कधीच म्हणणार नाही. आणि आता तीन वेळा त्याने तसे केले होते. पेत्राला फार वाईट वाटले. त्याला माहित होते की ते चुकीचे होते. पेत्र असे विचारू शकला असता, "आता मी काय करू? मला माहित नाही मी काय करावे." *कोंबडा या शब्दाच्या वेळी तुमच्या उजव्या हाताचा अंगठा तुमच्या कपाळावर ठेवा, आणि दुसरे दोन बोटे उचला.*





5. काही तासांनंतर, येशूला *वधस्तंभी* खिळण्यात आले. तो पापाची किंमत भरून देण्यासाठी वधस्तंभावर मरण पावला. सर्व शिष्य फार दुःखी होते, परंतु पेत्र कुठे होता? तो लपला होता, पश्चातापी आणि भयभीत होता. त्याने काहीतरी चूकीचे केले होते. तीन दिवसांनंतर येशू मरणातून पुन्हा उठला (तो पुन्हा जीवंत झाला). आता तो *वधस्तंभावर* नव्हता, किंवा तो मेलेला म्हणून कबरेतहि नव्हता, आणि एक गोष्ट जी येशू सर्वात आधी बोलला ती ही की शिष्यांना आणि पेत्राला सांगा की त्यांनी मला गालीलात भेटावे *वधस्तंभ शब्द बोलत असतांना तुमच्या हाताची बोटे आतल्या बाजूला वळवा आणि तुमचा अंगठा सरळ बाहेर काढा, वधस्तंभ तयार करा, प्रथम वरून खाली आणि डावीकडून उजवीकडे.*



6. "अरे वा, हे चांगले आहे" पेत्र म्हणाला आणि त्याला बरे वाटू लागले. जेव्हा पेत्र येशूच्या सान्निध्यात होता तेव्हा त्याला आनंदाहून चांगले वाटत होते. त्या सर्व दिवसांमध्ये पेत्राने विचार केला, "मी काय करावे हे मला माहित नाही." गालीलातील त्या दिवसांमधील एके दिवशी, पेत्राने बाकीच्या शिष्यांना सांगितले, मी मासे धरावयास जातो आणि ते त्याच्या सोबत गेले. ते सरोवरावर गेले आणि तेथे त्यांनी रात्रभर मासेमारी केली, परंतु त्यांना काही सापडले नाही. किना-यावरील कोणीतरी त्यांना जाळे उजव्या बाजूला टाकण्यास सांगितले (अजूनहि अंधार असल्यामुळे, त्यांनी ओळखले नाही की तो कोण आहे). जेव्हा त्यांनी उजव्या बाजूला जाळे टाकले तेव्हा जाळयात पुष्कळ मासे आले *मासे या शब्दाच्या वेळी तुमचे हात बंद ठेवा, तुमचा डावा हात उजव्या हातावर ठेवा आणि ते वरून खाली हलवा.*



7. "तो प्रभू आहे", योहान ओरडला. जेव्हा पेत्राने हे ऐकले, तेव्हा त्याने स्वतःला पाण्यात फेकले आणि येशूकडे येण्यासाठी तो वेगाने पोहू लागला. येशूची इच्छा होती की त्याने पेत्राला क्षमा केली आहे हे पेत्राला समजावे. येशूने पेत्राला सांगितले, "माझी मेंढरे पाळ, माझी कोकरे चार." पेत्राने येशूच्या त्याच्यावरील प्रीतीबाबत इतरांना सांगावे अशी येशूची इच्छा होती. येशू पेत्राबाबत अजून संपलेला नव्हता, पेत्राला आपल्या जीवनामध्ये महत्वाच्या गोष्टी करावयाच्या होत्या. सर्वात छान म्हणजे, पेत्राला हे कळले की येशूने त्याची क्षमा केली आहे आणि आता तो नविन जीवनाला सुरूवात करणार आहे. *क्षमा शब्दाच्या वेळी तुमच्या उजव्या हाताची बोटे डाव्या हातावर मुडपा.*



8. तुम्ही ही गोष्ट तुमच्या जीवनाला लागू करू शकता, कारण तुम्ही सुध्दा पेत्राप्रमाणे येशूचे शिष्य आहात, आणि तुम्ही त्याच्या मागे रस्त्याने चालत आहात. येशूजवळ आपली पातके कबूल करण्यामध्ये कधीहि उशिर झालेला नसतो. जर तुम्ही म्हणाल, "मी काय करावे हे मला समजत नाही, तरी महत्वाची गोष्ट आहे की तुम्ही खोटे बोलू नये आणि लपवू नये. कदाचित तुम्हाला स्मरण देण्यासाठी दुसरा कोंबडा तुमच्या आजूबाजूला नसणार, परंतु आता तुम्हाला ठाउक आहे की तुमच्या पापांची क्षमा करण्यासाठी येशू तुमच्यासाठी वधस्तंभावर मरण पावला. आणि आता तुम्ही माणसे धरणारे व्हावे अशी त्याची इच्छा आहे. कबूलीमधील चांगला भाग हा आहे जेव्हा येशू आनंदाने उडी मारतो आणि तुमची क्षमा करतो. *(सर्व कृति).*







# चक्राकार स्थानके

**स्थानकांकडे जाण्यासाठी तीन गटामध्ये विभागणी करा**

## गराज हस्तकाम

**मोटोक्रॉस चाकोरी**




प्रत्येक विद्यार्थ्याला वाटा:
रस्त्याचे चित्र असलेला एक कागद
थोडासा भुसा किंवा चमकी

- चैकोन आणि मोटार सायकल चालकांचे चित्र कापा किंवा बाहेर काढा.
- चैकोन घ्या आणि एका मार्गाने दाखविलेल्या रेघेवर त्यांना मुडपा, प्रत्येक चैकोनासाठी दोन जागा तयार करा.
- मुडपलेल्या जागेवर डिंक लावा आणि तुम्हाला वाटते त्या ठिकाणी त्यांना तुमच्या रस्त्यावर चिटकवा आणि एक पूल तयार करा.
- तुमच्या संपूर्ण रस्त्यावर डिंेक टाका आणि नंतर भूसा आणि/किंवा चमकी टाका आणि मोटोक्रॉस चाकोरी चालू करा.
- शेवटी, तुमच्या मोटार सायकलस्वारांना रंग लावा, त्यांच्यासोबत खेळा किंवा त्यांना तुमच्या रस्त्यावर चिटकवा

## फराळ गाडी

**चॉकलेट पुडींग/कुकीसोबत कस्टर्ड**



पदार्थ:

- चॉकलेट पुडींग/कुकीसोबत कस्टर्ड
- बिस्कीटे
- प्लॅस्टीकचे चमचे

सूचना:

1. चॉकलेट पुडींग/कस्टर्ड उघडा
2. बिस्कीटचे पुडे उघडा
3. बिस्कीटचे लहान लहान तुकडे करा
4. बिस्कीटाचे तुकडे कस्टर्डमध्ये टाका
5. पुडींगधील बिस्कीटाचे तुकडे ढवळा / कस्टर्ड चमचाने ढवळा

आता तुम्ही तयार झालेला पदार्थ आवडीने खावू शकता, जसे काय तुम्ही पाहिल्या ओळीमध्ये बसला आहात

## गाडी चालविण्याचा वर्ग

गाडी चालविण्याच्या वर्गामध्ये तूमचे स्वागत आहे, जेथे आपण विद्याथ्र्यांच्या पुस्तकांवर काम करणार आहोत. आजच्या दिवसाच्या धडयाचे नाव आणि आजचे वचन बोलून सुरू करू या का? सुरू करा !!!

## प्रश्न आणि उत्तरे

1. जर मला पश्चाताप करण्याची इच्छा नसेल तर काय होईल?

तुमच्या अंतःकरणामध्ये शांती असणार नाही, कारण देव आपल्या वचनांमध्ये आपल्याला सांगतो की आपण पश्चाताप करावा आणि मग तो आपली क्षमा करतो आणि पवित्र शास्त्रात सांगितल्याप्रमाणे आपल्याला शुध्द करतो.

2. मी केव्हाहि आणि कुठेहि पश्चाताप करू शकातो काय?

अर्थातच, ती एक फार चांगली गोष्ट आहे जी आपण करू शकतो. तुम्ही शाळेत असा किंवा आपल्या मित्राच्या घरी असा, तुम्ही जेथे आहात तेथे परमेश्वर तुमचे ऐकतो.

3. जर मी कोणाची क्षमा मागितली आणि त्यांनी माझी क्षमा केली नाही तर मी काय करावे?

तुम्ही दुस-या लोकांच्या कृतिसाठी जबाबदार नाही, तुम्ही जे करता त्यासाठीच तुम्ही जबाबदार आहात

4. पेत्र कुठला होता?

पेत्र गालीलातील होता

5. शिष्य होण्यापूर्वी पेत्राचे काम कोणते होते?

मासे धरणारा

## गाडी चालविण्याच्या वर्गाची उत्तरे



प्प्रार्थना ह्या चित्रांसारखी कशा प्रकारे आहे?

मोबाइल फोन

मी देवाबरोबर प्रार्थनेत बोलू शकतो, जसे फोन करणे आहे. देव मला संदेश पाठवू शकतो आणि मी तुझा संदेश पवित्र शास्त्रात वाचू शकतो. मला वाटत नसले तरी, मी संदेश सोडू शकतो आणि तो त्याला मिळेल.

सिंक 1 योहान 1:9 मी माझे पाप कबूल करून शुध्द होवू शकतो. जेव्हा मी आत्मिक रित्या तान्हेला असेल तेव्हा मी प्रार्थनेमध्ये त्याच्याकडे जाउ शकतो.

विदयूत केबल

जो पर्यंत तो जोडलेला नाही तो पर्यंत तो उपयोगाचा नाही. देवाबरोबर प्रार्थनेद्वारे जुळल्याने मला सामर्थ्य मिळू शकते.

कोंबडा

जसा तो पेत्रा बरोबर बोलला तसा तो कशाचाही उपयोग करून माझयाबरोबर बोलू शकतो.






ती कशासाठी प्रार्थना करून क्षमा मागत असेल? विचाराच्या बूडबूडयात ते काढा.



| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प | ये | श | प्रे | म | ना | ब | स़ | ळ |
| श्धा | पे | ना | र | घा | डा | फ | ती | ष़ |
| ता | प्रे | मा | का | ब | द़ | मा | प | न |
| प | न्या | स | कों | र | त्र | से | फ़्र | न्या |
| फ | र | हा | ओ | णे | णे | म | ये | हा |
| अ | ग्नी | र | री | ट् | ठ | व | शू | रो |
| न्न | द्द | दु | ऑ | च्र | ना | र | अ | ग्न |
| ती | ना | ख | कों | व | डा | पे | त्र | ठ़ |

## तयार, तत्पर, खेळ!

### अंतिम शर्यत (व्यक्तीगत खेळ)

सर्व चमू भाग घेवू शकतात. प्रत्येक चमूतून एका लेकराची निवड करण्यात येते जो इतरांसोबत खेळेले. लेकराला खेळातून बाद करण्यासाठी त्याच्यावर दोनदा खूण करा. जेव्हा शिक्षक म्हणतात, "जा" तेव्हा निवडलेल्या लेकराने सर्वांचा पाठलाग करावा आणि त्यांच्या खूण करण्याचा प्रयत्न करावा, जेव्हा तसे घडते, तेव्हा लेकराने त्याच्यावर जेथे खूण झाली आहे तेथे आपला हात ठेवावा. उदाहरणार्थ जर पाठीवर किंवा पायावर खूण केली असेल, तर त्याने आपला हात आपल्या पाठीवर किंवा पायावर ठेवावा, पळणे चालू ठेवावे आणि सुटण्याचा प्रयत्न करावा. जोवर त्यांचे होत मोकळे आहेत तोवर ते खेळू शकतात. जेव्हा लेकरावर दुसरी खूण होते तेव्हा तो खेळातून बाद होतो. ते दुसरा हाता ज्या जागी खूण झाली त्या जागी ठेवतात आणि खेळ संपेपर्येत हात हालवत नाहीत. जो बाद झाला नाही तो विजेता होतो . विजयी चमूला गूण मिळतात.

### चेंडूचा खेळ (चमूसाठी खेळ)

1. प्रत्येक व्हीबीएस चमूने पुढारी नेमावा.

2. प्रत्येक चमू एक पावलाचे अंतर ठेवून रांग तयार करील. पुढारी सर्वांच्या पुढे दोन पावलांच्या अंतरावर उभा राहील

3. प्रत्येक पुढा-याला चेंडू देण्यात येईल (उदाहरणार्थ, चूरगळलेला कागद)

4. सुरूवातीच्या ठिकाणापासून (उदाहरणार्थ, खुर्ची), ब-याच मीटर अंतरावर एक खूण ठेवा, ज्याच्या भोवती शर्यत फिरत राहील








5. पुढारी रांगेतील पहिल्या सदस्याकडे चेंडू फेकतो तेव्हा शर्यत सुरू होते. तो सदस्य चेंडू घेवून खूणेकडे धावतो आणि वापस येतो. तो आपल्या चमूतील सदस्यांकडे आल्यावर त्याने चेंडू पुन्हा पुढा-याकडे फेकावा आणि मग खाली बसावे.

6. अशाप्रकारे पुढारी चमूतील सर्वांकडे चेंडू फेकील. जेव्हा पूर्ण चमू खाली बसेल तेव्हा त्याने सुध्दा खूणेकडे पळावे.

7. जेव्हा पुढारी वापस येउन रांगेमध्ये बसतो तेव्हा खेळ समाप्त होतो

8. जी चमू सर्वात आधी खाली बसेल ती विजयी ठरेल

9. पुन्हा खेळण्यासाठी चमूला दुसरा पुढारी द्या.



# निष्कर्ष

आपल्या व्हीबीएसचा पहिला दिवस किती आनंदाचा होता नाही का? आपली वेळ आनंदात गेली आणि आपण शिकलो की जेव्हा त्याच्यावर दबाव आला तेव्हा पेत्राने येशूला नाकारण्याची मोठी चूक कशी केली. परंतु त्याने आपल्या पापावर ते पाप मान्य करून आणि कबूल करून विजय मिळविला. आपण पेत्रापासून शिकू शकतो आणि नियमीतपणे आपली पापे स्विकारू आणि कबूल करू शकतो. अशाप्रकारे, आपण आपल्या इंजिनमधील तेल ताजे ठेवू शकतो आणि जीवनाची शर्यत जिंकण्यासाठी धावू शकतो.

2

# देवाची आज्ञा पाळणे



पवित्र शाश्त्रातील गोष्टः नोहा आज्ञा पाळतो/ उत्पत्ति 6:9-14, 7:1-24

## वचन

“आपण त्याच्या आज्ञा पाळल्या तर त्यावरून आपणांस कळून येते की, आपण त्याला ओळखतो.” 1 योहानाचे 2:3

## नाटक

**परिवर्तन**

• मॅकॅनिक मेजाजवळ बसलेला आहे आणि त्याची पत्नी न्याहारी वाढत आहे तेव्हा त्यांची मुलगी प्रवेश करते. मुलगी नेहमीपेक्षा प्रेमळ आहे आणि प्रत्येकाला हात वर करून टाळी देते आणि ते तीघेजण थक्क होतात.

• उद्घोषक प्रवेश करतो आणि लेकरांना सांगतो की मॅकॅनिक आणि त्याच्या पत्नीला हे ठावूक नाही, परंतु त्यांनी त्यांच्या बंडखोर मुलीला चांगली ख्रिस्ती मुलगी म्हणून बदलविले आहे. नंतर तो म्हणतो, “आपण सर्वजण फरक पाहू शकतो.” मॅकॅनिक आणि त्याच्या कुटूंबाचे चकीत होणे चालू राहाते.

• पहिली गोष्ट जी आईच्या ध्यानात येते ती म्हणजे मुलीचे कपडे. ती विचारते की तिला शाळेत पेहराव घालण्यास सांगितले आहे का. आई हे सुध्दा विचारते की तिने नाकातील नथ आणि ती नेहमी घालते ते कपडे कुठे ठेवले आहेत. मुलगी वडीलांकडे कॉफीसोबत वर्तमानपत्र आणते.

**लक्ष वेधक**

बोलणाराः ‘तुम्ही देवाची आज्ञा पाळाल काय?’

मुलंः ‘मी पाळेल.... (टाळी, टाळी, ‘मी पाळेल’ मग दोन्ही हात पायांवर मारा)

‘मी पाळेल...’ टाळी, टाळी‘ मी पाळेल’ सह मग दोन्ही हात पायावर मारा.

‘मी देवाची आज्ञा पाळेल!’ टाळी, टाळी,‘मी पाळेल’ सह मग दोन्ही हातांनी दोनदा पायावर मारा ‘आज्ञा पाळा’ मग ‘देव’ म्हणून वर हात दाखवा.

• ती सांगते की तिने आपला गृहपाठ कसा केला आणि शाळेतील परीक्षेची तयारी कशी केली. मॅकॅनिक तिला विचारतो की तिला पेशांची गरज आहे का आणि ती म्हणते नाही.

• आईवडील बोलतात की आता त्यांना त्यांची मुलगी किती आवडते, आणि आता ते तिच्यासोबत किती आनंदाने राहात आहेत. जात असतांना, मुलगी शिक्षकांना देण्यासाठी एक बक्षिस नेते.

• ती जात असतांना, मॅकॅनिक आणि त्याची पत्नी बसतात, चकीत, काय झाले असावे याबाबत संभ्रमात पडतात. मॅकॅनिकला वाटते, “ही कोणती मुलगी आहे आणि तिने आमच्या मुलीचे काय केले आहे?”

• उद्घोषक पुन्हा येतो, असे म्हणतो की त्यांच्या लक्षात फरक आलेला आहे आणि तो बदल त्यांना आवडला आहे. उद्घोषक शेवटी अशी सूचना करतो की बंडखोर लेकरांच्या बदली त्यांना ख्रिस्ती लेकरे दिले जातील







## संदेश

स्वागत आहे लेकरांनो, शर्यतीमध्ये तुमचे पुन्हा स्वागत आहे....आणि व्हीबीएस मध्ये, "तूमचे इंजिन सुरू करा" मध्ये सुध्दा स्वागत आहे. आज आपण शर्यतीमधील आणखी एका महत्वाच्या भागाबाबत शिकणार आहोत: चाके. शर्यतीमध्ये, मोटार सायकलचे टायर्स फार महत्वाचे असतात! हे स्पष्टच आहे की टायरशिवाय मोटार सायकल धावणार नाही, परंतु चांगली पक्कड सुध्दा महत्वाची आहे!!! टायरची चांगली पक्कड मोटार सायकलला नेहमी चिपकून राहण्यासाठी मदत करते, यासाठी की तुम्ही चाकोरीवर घसरू नये. शर्यतीमध्ये सुरूवात करण्याआधी ते मोटार सायकलला नविन टायर्स लावतात. यामुळे, पूढील चाकोरीसाठी पक्कड चांगली आहे याची ते खात्री करून घेतात.

सर्व बाबतीत देवाची आज्ञा पाळणे हे तुमच्या मोटार सायकलला नविन टायर्स लावण्यासारखे आणि शर्यतीच्या चाकोरीवर मजबूत पक्कड असण्यासारखे आहे. जर तुम्हाला जीवनामध्ये योग्य जागी पोहोंचायचे असेल आणि देवासाठी काहीतरी महान करावयाचे असेल, तर तुम्हाला पक्कडची गरज आहे. याचा अर्थ आहे तुम्हाला कशाची गरज आहे? आज्ञापालन! जग आपल्याला सांगते की आपण भूमिका घ्यावी, आणि जर काहीतरी महान करावयाचे असेल तर स्वतःवर विश्वास ठेवला पाहिजे, परंतू देव आपल्याला शिकवितो की आपण आज्ञापालन करावे आणि त्याच्या आज्ञांचे अनुसरण करावे. स्वःतावर भरवसा ठेवण्याऐवजी आणि ज्या महान देवाची सेवा करतो त्याच्यावर आपण भरवसा ठेवावा. तो आपल्यावर कितीतरी प्रेम करतो, आपण जीवनामध्ये काहीतरी महत्वपूर्ण व्हावे अशी त्याची इच्छा आहे! आज्ञापालनाने याची खात्री होईल की आपण आपल्या जीवनाला कृतिची जोडे देत आहोत. आज आपण एका महान वयोवृध्द मनुष्याच्या आज्ञापालनाकडून धडा शिकणार आहोत, नोहा. त्याने देवाची आज्ञा पाळली जरी वर्षामागून वर्षे निघून चालली होती, आणि देवाची आज्ञा पाळण्यासाठी कारणहि नव्हते. परंतु तुमच्यासाठी आणि माझ्यासाठी याचा अर्थ काय आहे?

आपल्या आईवडीलांची आज्ञा पाळणे म्हणजे काय हे आपल्याला माहित आहे - त्याचा अर्थ आहे ते जे बोलतील त्याप्रमाणे करणे. परंतु देवाची आज्ञा पाळणे म्हणजे काय? त्याला काय पाहिजे आहे हे आपल्याला कसे कळेल जेव्हा आपण त्याला पाहात नाही किंवा त्याचा आवाज आपल्याला ऐकू येत नाही? प्रमुख मार्ग ज्याकडून आपण देवाची आज्ञा पाळू शकतो तो आहे पवित्र शास्त्रातील त्याच्या आज्ञा पाळणे. पवित्र शास्त्रामध्ये आपल्याला पुष्कळ धडे सापडतील की आपण कसे जगावे आणि इतरांसोबत कसे वागावे, जसे येशूने केले. आणखी, आपल्या भल्यासाठी देवाने आपल्यावर आधिकारी ठेवलेले आहेत. म्हणून, जेव्हा आपण आपले आईवडील, शिक्षक किंवा आपल्या पाळकांच्या आज्ञा पाळतो तेव्हा आपण देवाची सुध्दा आज्ञा पाळतो. कधीकधी देव आपल्याला व्यक्तीगत सूचना सुध्दा करतो. कधीकधी, आपल्या आत्म्यामध्ये आपल्याला कळते की आपण कोणाची तरी मदत करावी, त्यांना काहीतरी द्यावे, किंवा एखाद्यावर दया करावी. जेव्हा जेव्हा आपल्याला पवित्र शास्त्रामध्ये देवाची आज्ञा म्हणून विशेष आदेश सापडतो आणि आपले आईवडील आणि पाळक त्यासोबत सहमत होतात, तेव्हा आपल्याला कळते की आपण ती आज्ञा पाळावी आणि त्याकडून देवाला आनंद होईल. असे केल्याने आपण आपल्या जीवनाने काहीतरी विशेष कय, आपण आपल्या शर्यतीच्या मोटार सायकलवर नविन टायर बसवू आणि आपल्या जीवनामध्ये मजबूती येईल. देवाच्या मागे जावू आणि नोहाप्रमाणे करू. पवित्र शास्त्र, आपले अधिकारी, आणि आपल्या अंतर्यामातील पवित्र आत्म्याची वाणी ऐकू. मुलांनो आणि मुलींनो, ही शर्यत जिंकण्यासाठी मजबूत पक्कडीने धावा.







## थंडावा दूर करणारा खेळ

**वीज**

मुले, मुली, वस्तुनिष्ट




तुमच्या विद्यार्थ्यांना दोन किंवा चार चमूमध्ये विभागा. किती गट असावेत हे तुमच्या गटाच्या आकारावर अवलंबून राहील. समोरासमोर तोंड असलेल्या ओळी तयार करा. रांगेमध्ये एखादी वस्तु ठेवा. विद्यार्थी आपल्या जवळच्या व्यक्तीचा हात धरतील. पुढारी रांगेतील पहिल्या मुलाचा आणि मुलीचा हात धरेल. (प्रत्येक चमूसाठी तुम्हाला एका पुढा-याची गरज लागेल). पुढारी प्रत्येक चमूच्या रांगेतील पहिल्या विद्यार्थ्याचा हात दाबेल. जेव्हा तुमचा हात दाबला जाईल, तेव्हा तुम्ही रांगेतील जवळच्या व्यक्तीचा हात दाबावा आणि जास्तीत जास्त लवकर असे पूर्ण रांगेसाठी करावे. जी चमू सर्वांचे हात दाबून समोर ठेवलेली वस्तु प्रथम घेईल ती विजयी ठरेल. जर आणखी गंमत यावी असे वाटत असेल तर डोळे बंद करून हे करा

## पवित्र शास्त्रातील धडा

**नोहा आज्ञा पाळतो**



1. देवाने जग निर्माण केल्यावर <u>लोक</u> वाढू लागले आणि जास्त आणि जास्त लोक व्हायला लागले. त्या वेळी एचढे <u>लोक</u> झाले की ते मोजण्याच्या पलीकडे होते, परंतु <u>लोक</u> विसरून गेले की देवाने त्यांना निर्माण केले आहे. ते देवाची आज्ञा पाळण्यासहि विसरले आणि ते स्वःइच्छेसाठी काम करू लागले, लबाडी, एकमेकांना जखमी करणे आणि मारून सुध्दा टाकू लागले. देवाला काय पाहिजे याबाबत ते पर्वा करीत नव्हते आणि त्यामुळे देवाला दुःख वाटले.

*<u>लोक</u> शब्दाच्या वेळी तुमचा अंगठा आणि मधले बोट चिटकवून आळीपाळीने गोलाकार करा*



2. त्या अवज्ञेमध्ये एक व्यक्ती होता जो देवावर प्रेम करीत होता आणि त्याची <u>आज्ञा पाळीत</u> होता. त्याचे नाव नोहा होते. एके दिवशी देवाने ठरविले की सर्व आज्ञाभंग करणा-या लोकांचा महापूराचा वापर करून नाश करावा. म्हणून देव नोहासोबत बोलला आणि म्हणाला की तो मोठे वादळ पाठविणार आहे. त्यावेळेपर्यंत पृथ्वीवर पाऊस पडला नव्हता आणि पाऊस पडणे म्हणजे काय हे नोहाला माहित नव्हते. जे माहित नव्हते किंवा समजत नव्हते त्याविषयी <u>आज्ञा पाळणे</u> नोहासाठी कठीणच असेल. <u>देवाने</u> नोहाला सांगितले, "असा पाऊस पडणार आहे जो सर्व पृथ्वी व्यापून टाकेल, परंतु तुझ्यासाठी, तुझ्या कुटूंबासाठी, आणि ज्या प्राण्यांना मी निर्माण केले आहे त्यांनी तारवात प्रवेश करावा आणि सुरक्षित राहावे म्हणून तू एक तारू तयार करावे(फार मोठे जहाज)

*आज्ञा पाळणे हा शब्द बोलत असतांना तुमची मूठ तुमच्या कपाळाजवळ न्या आणि आपल्या हाताचे पंजे वर करून त्यांना खाली आणा.*



3. तारू नेमके कसे करावे हे देवाने नोहाला सांगितले, कोणत्या प्रकारचे लाकूड वापरावे आणि तो ते किती मोठे करणार आहे. तारवाचा आकार फूटबौलच्या मैदानापेक्षा मोठा होता. नोहाने लाकूड तोडणे आणि खिळे टोकण्याचे काम सुरू केले. नोहाने आणि त्याच्या कुटंबाने हे अगडबंब जहाज तयार करण्यासाठी पुष्कळ वर्षे काम केले. वर्षानूवर्षे देवाची आज्ञा पाळणे आणि जे तुम्हाला समजत नाही ते करणे, आणि देवाने जे सांगितले आहे ते तो कसे पूर्ण करील याबाबत विस्मय करणे याचा तुम्ही विचार करू शकता का?

*देव या शब्दाच्या वेळी उजव्या हाताचे पाहिले बोट वर करा. छातीवर हात ठेवून खाली करा आणि उघडा.*

4. एकदा देव नोहाला म्हणाला, “तुझ्या कुटूंबासोबत तारवात प्रवेश कर आणि प्राण्यांना सुध्दा तुझ्यासोबत तारवात प्रवेश करू दे.” पुन्हा, नोहाने आज्ञा पाळली, त्याने सर्व प्राण्यांसाठी आणि आपल्या कुटूंबासाठी अन्न भरले आणि ते तारवात चढले, मोठयात मोठयापासून लहानातील लहानापर्यंत. शेवटी, नोहा आणि त्याच्या परिवाराने तारवात प्रवेश केला. अचानक त्याला पिटर पॅटर असा आवाज आला, पाऊस पडण्यास सुरूवात झाली आणि पाऊस वाढू लागल्यामुळे देवाने तारवाचे दार बंद केले



*कुटूंब या शब्दाच्या वेळी अंगठा आणि पहिले बोट एकमेकांना स्पर्श करीत असतांना हात एकमेकांना स्पर्श करीपर्यंत बाहेरील वर्तूळ तयार करा*

5. पाऊस आधीच फार जोराने पडत होता, डबके मोठे होत गेले, लवकरच प्थ्वी महापूराच्या पाण्याने भरून गेली आणि तारू पाण्यावर तरंगू लागले. (ढबासोबत पाण्याच्या पातळीचे चित्र काढा). 40 दिवस आणि 40 रात्री पाऊस पडला. पाऊस एवढा जोराचा होता की सर्वात मोठे पर्वत सुध्दा पाण्याखाली बूडून गेले. मग एक दिवस उजाडला आणि सर्व काही शांत झाले, पाऊस संपला होता. (सुर्याचे चित्र काढा). पृथ्वीला पूर्णपेणे सुकण्यासाठी जवळ जवळ एक वर्ष लागले. एके दिवशी देवाने नोहाला सांगितले की त्याचे कुटूंब आणि प्राणी तारवातून बाहेर पडू शकतात. पुन्हा पृथ्वीवर येण्याचा तो दिवस किती आंनददायी असला पाहिजे! नेहा आणि त्याचे कुटूंब आता पळू शकत होते, पूर्ण सुर्यप्रकाशात आपले पाय पसरू शकत होते



*पाऊस या शब्दाच्या वेळी, हाताचा आकार कपासारखा करून हात वर करा. बाजूला गोलाकार कृति करा.*

6. पहिली गोष्ट जी नोहाने केली ती म्हणजे त्यांना सुरक्षित ठेवल्याबद्दल <u>देवाचे आभार मानले</u>. नोहाच्या कृतज्ञेबाबत <u>देव</u> संतुष्ट झाला आणि त्याने वचन सुध्दा दिले की, “आतापासून पृथ्वीचा नाश पाण्याने कधीच होणार नाही.” तर आपल्याला त्या वचनाची आठवण देण्यासाठी <u>देवाने</u> आकाशात सुंदर मेघधनुष्य ठेवले आहे. मला वाटते <u>देव</u> नोहाच्या बाबतीत फार आनंदी होता की त्याने त्याची <u>आज्ञा पाळली</u>, जरी देव त्याला जे करावयास सांगत होता ते सर्व त्याला समजत नव्हते. जेव्हा तुम्ही मेघधनुष्य पाहाता, आठवण ठेवा की देवाने ते चिन्ह म्हणून ठेवले आहे की येथून पुढे तो जगाचा नाश पाण्याने करणार नाही. देवाची <u>आज्ञा पाळणे</u> कदाचित तुमच्यासाठी कठीण असेल, परंतु आठवण ठेवा की जर आपण विनंती केली तर तो आपली मदत करील. तो आपल्यावर प्रेम करतो आणि जेव्हा आपण <u>त्याची आज्ञा पाळतो</u> तेव्हा तो आपली प्रीती प्रदर्शित करतो.



*<u>आभार</u> शब्दाच्या वेळी तुमच्या बोटाचा समोरचा भाग तुमच्या तोंडावर ठेवा आणि पुढे आणि खाली करा*

# चक्राकार स्थानके

**स्थानकांकडे जाण्यासाठी तीन गटात विभागणी करा**

## गराज हस्तकाम

**मोटार सायकलस्वारांचे हेल्मेट**




प्रत्येक विद्यार्थ्याला द्या:

कागद ज्याच्यावर हेल्मेटचे चित्र आहे आणि पवित्र शास्त्रातील वचने आहेत.
एक निळा स्पंज किंवा निळा कागद
दोन पिवळे स्पंज किंवा कागद
1 हिरवा स्पंजचा तुकडा किंवा कागद
एक सेफ्टी पीन

सूचना:

- स्पंज किंवा रंगीत कागद आणि हेल्मेटच्या चित्राने नमूना तयार करा
- जेव्हा सर्वकाही व्यवस्थित होईल तेव्हा डिंकाने चिटकवा
- सेफ्टी पिन जोडा, यासाठी की त्यांच्या कपडयासोबत लटकवता येईल

फराळ गाडी

**सफरचंदची गाडी**



*पदार्थ:*

- सफरचंद
- मनूके किंवा जांभळे द्राक्षे
- दातकोरणी

*सूचना:*

1. सफरचंदाचे अर्धवतूॅळ आकाराचे तुकडे करा
2. कापलेले तुकडे खाली राहातील असे ठेवा
3. दातकोरणी सफरचंद तुकडयांमध्ये टोचा. एक मागे आणि एक समोर
4. द्राक्ष किंवा मनुके दातकोरणीच्या चार टोकांना टोचा, चाकांना गती द्या.

*तयार ! आता आपल्याकडे चवदार कार तयार झाली आहे*

## गाडी चालविण्याचा वर्ग

गाडी चालविण्याच्या वर्गामध्ये आपले स्वागत आहे, ज्यामध्ये आपण विद्याथ्र्यांच्या पुस्तकावर काम करणार आहोत. आपण आपल्या वर्गाची सुरूवात आजचा धडा पुन्हा म्हणून आणि आजचे वचन म्हणून करायची का? चला तर मग सुरू करू!!!

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| च़ | रू | आ | नो | ह | ल | क़ | ढ़ | णे |
| पु | शे | ज्ञा | री | णे | घ | त्र | ध | रू |
| प्रा | णी | ल | वि | ऍ | पा | बां | फ़्र | पा |
| स्र | य | च | प | श्धा | उ | ख़्र | नो | ऊ |
| शे | वा | य्र | त्र | द्व | स | ळ | हा | स |
| ह | जा | ऑ | भ्रङ | ब | ण | फ्र | ब | ल |
| घ्र | ड्न | री | ध्र | चा | त़ | नि | ग | स़ |
| ता | त्र | औ | दे | व | पु | जं | दे | इ़ |
| उ | रू | वि | श्ध | स़ | ऌ | त्र | ऊ | श |

पवित्र शास्त्राचा सल्ला घ्या व बरोबर विधानासमोर बरोबर व चूक समोर चूक लिहा

1. प्रलयानंतर नोहा 350 वर्ष जगला. 950 उत्पत्ती 9:28-29 — **(बरोबर)** चूक
2. देवाने नोहाला पुन्हा कधी पाउस पडणार नाही हयाचे अभिवचन म्हणून इंद्रधनुष्य दिला. उत्पत्ती 9:12-16 — बरोबर **(चूक)**
3. तारवामध्ये शुध्द 14 प्रकारचे प्राणी होते. उत्पत्ती 7:2 — **(बरोबर)** चूक
4. नोहाचे पूर्वज कोण आहेत हे आपल्याला माहित नव्हते. उत्पत्ती 5 — बरोबर **(चूक)**
5. पवित्र शास्त्रातील सर्वात वयस्क व्यक्ति मथूशलह 969 नोहाचा आजोबा होता. उत्पत्ती 5:25-28 — **(बरोबर)** चूक
6. तारू तयार करण्यासाठी 100 वर्ष लागले. उत्पत्ती 7:6 — **(बरोबर)** चूक
7. पक्ष्याच्या प्रत्येक प्रकाराची एक जोडी तारवात होती. उत्पत्ती 7:3 — बरोबर **(चूक)**









तुम्ही प्रत्येक प्राण्याचे 2 मिळवू शकता का? जे प्राणी त्यांच्या जोडीदारांची वाट पाहत आहेत त्यांना गोल करा. न पाहता हया चित्रात एका मिनीटा तुम्ही किती प्राण्यांचे नाव सांगू शकता?



## प्रश्न आणि उत्तरे

1. जेव्हा माझे आईवडील न्याय्य नसतात तेव्हा काय होते?

जीवन न्याय्य नाही, उदाहरणार्थ, जर भूमिकंप झाला तर त्या भागातील लोकांना झळ पोहोंचते मग ते चांगले असोत किंवा वाईट असोत. नेहमी अन्याय होतो, आपल्या घरी सुध्दा. आपल्या आईवडीलांची आज्ञा पाळण्याचा मार्ग नसेल का, जरी ते आपल्याला काहीतरी चूकीचे करण्यास सांगतात? देव सर्वकाही पाहातो, जरी आपले आईवडील पाहात नसतील. एक उदाहरण: खोटे बोलणे

2. देवाने तुम्हाला काहीतरी करण्यास सांगितले आहे का? ते देवापासून होते हे तुम्हाला कसे समजले?

कधीकधी आपल्याला वाटते की आपण कोणाची तरी मदत करण्यासाठी जावे, किंवा आपल्याला वाटते की कोणीतरी आपल्याला हैराण करीत आहे, किंवा आपल्याला जे करायचे आहे त्याबाबत आपल्याला सतत आठवण देत आहे. देव आपल्याला आठवण करून देत आहे, कारण जरी आपण विसरण्याचा प्रयत्न केला, तरी आपण विसरू शकत नाही. कधीकधी आपण जे केले पाहिजे त्याबाबत रात्री आपल्याला स्वप्न पडते.

3. तुम्ही देवाची आज्ञा पाळता असे तुम्हाला वाटते का?

तुमच्या लेकरांसोबत मोकळी चर्चा करण्याचा प्रयत्न करा, कोणीहि कोणाला दोषी ठरविणार नाही. तुमच्या स्वःताच्या चूका आणि अपयशाबाबत सांगा यासाठी की त्यांना सुध्दा सांगण्यास मोकळे वाटेल. कोणती कृति आज्ञापालन दाखविते आणि कोणती आज्ञाभंग दाखविते याबाबत चर्चा करा.

4. तारवामध्ये किती लोकांनी प्रवेश केला?

आठ

5. नोहाच्या मुलांची नावे काय होती?

शेम, हाम आणि याफेथ

## तयार, तत्पर खेळ!

**ट्रक ओढणे (व्यक्तीगत)**

खेळण्यापूर्वी:

• एका मुलाला (ओढावयाचा ट्रक म्हणून) नेमा जो मोटार सायकल्स ट्रकला बांधेल (जे बाकीचे लेकरे आहेत)

• खेळासाठी सिमा आखून द्या

खेळण्यासाठी

मोटार सायकल्स नेमून दिलेल्या हद्दीत राहातात आणि ओढून नेणारा ट्रक धावेल, त्यांना पकडण्यासाठी. जेव्हा तो आपल्या हाताने मोटार सायकल पकडेल, ती मोटार सायकल आपला हात खेळाडूच्या हातात देईल. मोटार सायकल त्याच्या हाताला जोडलेली असतांना, ओढणारा ट्रक इतर मोटार सायकल पकडण्याचा प्रयत्न करील आणि साखळी तयार करील. जर कोणी आखून दिलेल्या सिमेच्या बाहेर गेला तर त्यांनी स्वतःला ओढणा-या ट्रकसोबत जोडले पाहिजे.

लक्षात घ्या: जेव्हा गट मोठा असतो तेव्हा दोन साखळया तयार कराव्या लागतील आणि दोन ओढणारे ट्रक्स ठेवावे लागतील, जे मोटार सायकल्स पकडण्याचा प्रयत्न करतील.

**रिले रेस (संघ)**



या रिले रेससाठी दोन मुलांचे एक एक पाय सोबत बांधा.

चमू तयार करा, दोन्ही चमूतील मुलांची जोडी सारखीच राहील असा प्रयत्न करा.

खेळाच्या मैदानामध्ये चाकोरी तयार करा, प्रत्येक चमूसाठी एक एक चाकोरी.

दिव्यांजवळ, पहिली जोडी चाकांरीतून धावते, नंतर दुसरी जोडी आणि तसेच पुढे चालू राहील, जोवर पूर्ण चमू पळत नाही.

जी चमू प्रथम पूर्ण करील ती विजयी होईल

# निष्कर्ष

आपला व्हीबीएस चा दिवस किती आनंदाचा होता! आपली वेळ फार चांगली गेली आणि आपण शिकलो की नोहाने केवळ देवाची वाणी ऐकली असे नाही तर जीवनामध्ये त्याच्या टायरची पक्कड चांगली होती, त्याने देवाचा शब्द पाळला. आपण सर्वजण नोहापासून शिकू शकतो आणि आपल्या जीवनामध्ये देवाची आज्ञा नियमीतपणे पाळू शकतो. अशाप्रकारे आपण त्वरीत वेग पकडण्यासाठी आणि जीवनाची शर्यत जिंकण्यासाठी आपल्या 'मोटार सायकलवर' चांगले 'टायर्स' ठेऊ शकतो.







# 3 खरी प्रीती

पवित्र शास्त्रातील गोष्ट: रूथ प्रीती करते / रुथ 1:1-4:17



## वचन

*“जो संदेश तुम्ही प्रारंभापासून ऐकला तो हाच आहे की, आपण एकमेकांवर प्रीती करावी.” 1 योहानाचे 3:11*

## नाटक

**प्रीती**

> **लक्ष वेधक**
> बोलणाराः ‘पुन्हा करा’
> मुलंः‘तीनदा टाळी तीनदा टाळी
> ‘व्रूम, व्रूम!’ गाडी सुरू करण्यासारखे हात करून.
> ‘चाला जाउया!’ आधी हवेत उसवी मुठ, मग डावी मूठ

- मॅकॅनिक प्रवेश करतो आणि एका गि-हाईकाबाबत सांगतो ज्याने आपली मोटार सायकल दुरूस्तीसाठी आणली कारण ती जास्तच गरम होत होती. मोटार सायकलमधून धूर निघत आहे. मॅकॅनिक काम करण्यास सुरूवात करतो, स्वःताशी पूटपूटतो, “ही मोटार सायकल गरम झाली नसती, जर त्याने खराब इंजिनसाठी थंडावा निर्माण करणारा भाग वापरला असता. आता मला माहित नाही की मी ही गाडी दुरूस्त करू शकेल किंवा नाही
- त्याचवेळी त्याचा लहान कुत्रा प्रवेश करतो आणि मॅकॅनिकसोबत बोलण्यास सुरूवात करतो. मॅकॅनिक आजूबाजूला पाहातो, चकीत होतो, आणि कोण बोलत आहे हे शोधतो. तो काही वेळ घालवितो आणि मग त्याच्या लक्षात येते की त्याचा कुत्रा त्याच्यासोबत बोलत आहे.
- कुत्रा अशा गोष्टी सांगतो ज्या केवळ त्यालाच माहित आहेत आणि त्याकडून सिध्द करतो की तोच त्याच्यासोबत बोलत आहे . “तुला आठवते का जेव्हा तुझ्या पत्नीने तुझ्यासाठी विशेष जेवण तयार केले होते आणि तू तिला सांगितले की ते तुझ्या जीवनामधील सर्वात चविष्ट जेवण आहे आणि एक चमचा जेवण घेतल्यावर, तू बाकीचे जेवण मला दिले?”
- सरतेशेवटी मॅकॅनिक आपल्या लहान कुत्र्यावर विश्वास ठेवतो आणि ते बोलण्यास सुरूवात करतात की सर्व कुत्रे बोलू शकतात, परंतु ते बोलणे लपवून ठेवतात . ते बोलत असतांना मॅकॅनिकचे मोटार सायकलवर काम करणे चालूच असते







- मॅकॅनिकला समजते की आज त्याचा कुत्रा त्याच्यासोबत यासाठी बोलत आहे की त्याला त्याच्या सर्व प्रीतीसाठी आणि काळजीसाठी त्याचे उपकार मानावयाचे आहेत आणि मग प्रेमासाठी आणि अलिंगणासाठी काही वेळ द्यावयाचा आहे. मग कुत्रा निघून जातो.
- नाटक तेव्हा संपते जेव्हा मॅकॅनिक बोलतो इेजिन मृत झाले आहे कारण ते जास्त गरज झाले होते आणि मालकाला दुसर इंजिन विकत घ्यावे लागेल.
- जेव्हा मॅकॅनिक जातो तेव्हा तो म्हणतो, "जर त्याने थंडावा निर्माण करणारे उपकरण लावले असते तर त्या इंजिनमध्ये अजूनहि जीवंतपणा राहीला असता."

## संदेश

अहो लेकरांनो, तुम्ही तुमचे इंजिन चालू करण्यास तयार आहात का???

काहीहि असो, ही शर्यत कोण जिंकणार आहे? तुम्ही तुमची मोटार सायकल जास्तीत जास्त पळविणार आहात का? जर नाही, तर मग तुम्ही रस्ता सोडलेला बरा, कारण शर्यतीमध्येच मोटार सायकल उत्तम काम करतात. मोटार सायकल चालू असते तेव्हा इंजिन फार गरम होते आणि थंडावा निराधक उपकरण इंजिन जास्तच गरम होऊ नये यासाठी फारच महत्वाचे असते. म्हणून आज आपण थंडावा निरोधक शिकणार आहोत! हा एक द्रवपदार्थ आहे जो तुम्ही रेडीएटरमध्ये पाण्याऐवजी टाकता. हा द्रवपदार्थ संपूर्ण इंजिनमध्ये प्रवाहीत होतो आणि इंजिनला थंड ठेवतो, मोटार सायकल फार जोराने धावते तेव्हा सुध्दा हा द्रवपदार्थ गाडीला थंड ठेवतो. हे नसेल तर इंजिन वाजवी पेक्षा जास्त गरम होते आणि धूर सोडण्यास सुरूवात करते, कधीकधी तर आग पण लागते! जी मोटार सायकल गरम होते ती शर्यत जिंकून देऊ शकत नाही. तुमच्या आध्यात्मिक जीवनास हे कसे लागू पडते? ख्रिस्ती व्यक्तीच्या जीवनामध्ये प्रीती ही मोटार सायकलमधील थंडावा उपरोधक उपकरणासारखी आहे. लोकांमध्ये नेहमीच ताणतणाव असतील, देवाने आपणा सर्वांना वैशिष्टयपूर्ण निर्माण केले आहे, आपल्यामध्ये अलग अलग विचारसरणी आणि चारीत्र्य आहे. जेव्हा आपल्या जीवनामध्ये प्रीती नसते तेव्हा आपण भांडण करू आणि आपले गैरसमज होतील. तुम्ही असे दोन लोक पाहिले आहेत का जे सहसा एकमेकांसोबत चांगले वागतात पण आता भांडत आहेत? होय, प्रत्येकजण! फार काय चांगल्या चर्चेसमध्ये सुध्दा समस्या निर्माण होतात आणि देवाची इच्छा असते की आपण एकमेकांवरील प्रीती दाखववी. प्रीती अभावी आपल्या जीवनामधेन धूर निघेल, किंवा आपल्या चर्चमधून धूर निघेल आणि आग सुध्दा लागू शकते. आणि फार महत्वाचे म्हणजे जर मी आणि तुम्ही इतरांसाठी प्रेम दाखवत नाही तर आपण वाजवीपेक्षा जास्त तापू आणि शर्यत जिंकणार नाही.

गरमी निरोधक संयत्र का महत्वाचे आहे? बघा, पवित्र शास्त्र हे स्पष्ट करते की प्रीती हा असा गूण आहे जो आपण आपल्या ख्रिस्ती जीवनामध्ये सर्वात जास्त लागू केला पाहिजे. इतरांवरील प्रीती दाखविण्याचा अर्थ काय? 1 योहान 3:16 आपल्याला प्रीती समजण्यासाठी मदत करते. "ख्रिस्ताने आपल्याकरीता स्वःताचा प्राण अर्पिला हयावरून आपल्याला प्रीतीची जाणीव झाली आहे; तेव्हा आपणहि आपल्या बंधूकरीता स्वःताचा प्राण अर्पिला पाहिजे." पवित्र शास्त्र सांगते की आपण दुस-यांसाठी आपला प्राण अर्पिला पाहिजे, परंतु कसा? त्याचा अर्थ आहे सर्वात लहान केकचा तुकडा घेणे, आर्केडमध्ये तुमच्या मित्राला पहिल्यांदा खेळण्यास सांगणे, तुमच्या आईवडीलांना मदत करणे, जरी त्यांनी तुमची मदत मागितली नाही, शाळा सुटल्यावर तुमच्या मित्राची वाट पाहाणे, शाळेमध्ये त्या मुलासोबत चांगले वागणे जरी तो तुमच्यासोबत चांगला वागत नाही, आणि आणखी बरेच काही . किती मार्गांनी आपण दुस-







यांवरील प्रीती व्यक्त करू शकतो? यादी अमर्यादीत आहे! प्रीती व्यक्त करण्याचे मार्ग समजल्यावर आपल्याला त्याचे महत्व सुध्दा समजले पाहिजे. ती अशी गोष्ट नाही जी आपण ज्या धार्मिक गोष्टी करतो त्यासोबत आपण करावी: चर्चला हजर राहाणे, दान देणे, आणि आपल्या आईवडीलांची आज्ञा पाळणे. येशू नव्या करारामध्ये ही गोष्ट स्पष्ट करतो की तुमचा 'धर्म' काम करीत नाही, जर तुमच्याकडे दुस-यांसाठी प्रीती नाही - तुमचे जीवन देणे आणि इतरांना तुमच्या आधी ठेवणे.

आज आपण एका शर्यत खेळणा-या एका प्रभावी चालकाची भेट घेणार आहोत - रूथ.

दुस-यांसाठी आपले जीवन कसे द्यावे याचे ती आपल्याला उत्कृष्ट उदाहरण देते.

आपण आपल्या ख्रिस्ती जीवनाची काळजी घेणार आहोत, यासाठी की आपण खूप वेळ देवाची सेवा करू शकू.

आपण एकमेकांवरील प्रीती व्यक्त करू आणि शर्यत जिंकू.

## थंडावा दूर करणारा खेळ

**आकडे आणि कृति**

विद्याथ्र्यांना दहा किंवा शक्य असेल तर बाराची एक एक चमू तयार करण्यास सांगा. लक्षात ठेवा की लहान मुले आणि मोठी मुले सुध्दा एकाच चमूमध्ये खेळू शकतात. चमू ओळीमध्ये उभे राहातील, प्रत्येक विद्यार्थी आपल्या वर्गातील मुलासमोर उभा राहील. जर तुम्हाला वाटते की लेकरांना हलवू नये, तर ते जेथे बसले आहेत तेथे तुम्ही हा खेळ खेळू शकता.

स्पष्ट करा की प्रत्येक नंबरला कृति करावी लागेल





1. आपण आपल्या जोडीदाराला हात वर करून टाळी देऊ.
2. गुडघ्यामध्ये वाकून उभे राहा.
3. हात वर करून उडया मारा.
4. मागे वळा
5. मोकळी कृति (येथे काही गीते गावीत).

पुढारी संख्या बोलतो आणि विद्यार्थी त्यांनूसार कृति करतील. कृति करतांना जे गोंधळून जातील त्यांनी खाली बसावे, परंतु लक्षात ठेवा की थंडावा दूर करणा-या खेळांचा उद्देश सर्वांना एकत्र आणणे हा आहे. मज्जा ही या खेळातील सर्वात महत्वाची गोष्ट आहे

## पवित्र शास्त्र धडा

**रूथ प्रीती करते**

1. इस्त्राएल कुटूंबामध्ये लग्न झालेली, जे मवाब देशामध्ये राहात होते, रूथ एक सुंदर मवाबी मुलगी होती (मवाब प्रांतातील). रूथ आणि तिचा <u>पती</u> तिच्या <u>पतीच्या</u> परिवाराच्या घरामध्ये राहात होते. काही दिवसांनी तिच्या <u>पतीचे</u> वडील मरण पावले आणि नंतर तिचा <u>पती</u> आणि जाऊचा <u>पती</u> सुध्दा वारला. आता रूथ, तिची जाऊ आणि










सासू, नामी, एकटया होत्या, त्या तिघीहि विधवा झाल्या होत्या (त्यांचे <u>पती</u> मरण पावले होते).

*<u>पती</u> शब्दाच्या वेळी, उजव्या हाताची बोटे बंद करा, जेव्हा तुम्ही ते आपल्या डोक्यावरून काढता . तुमचे हात धरून ठेवा*


2. त्या दिवसांमध्ये, ज्या स्त्रीला <u>पती</u> तिचे जीवन फार कठीण असायचे. स्वःताचे पालनपोषण करण्यासाठी काम करणे तिला फार कठीण असायचे. तिन स्त्रियांनी कदाचित विचार केला असेल आता आपले <u>पती</u> मरण पावले



आहेत तर आपली मदत कोण करील? नामीने आपल्या दोन सूनांना सांगितले, "तुमच्या कुटूंबाकडे परत जा, कदाचित येथे तुमचा पुनःविवाह होऊ शकतो, परंतु मी माझा देश इस्त्राएलला वापस जाते." त्यांना नामीला <u>सोडण्याची</u> इच्छा नव्हती, परंतु शेवटी रूथच्या जावेने ठरविले की नामीला <u>सोडावे</u> आणि आपल्या कुटूंबाकडे परत जावे


*<u>सोडावे</u> या शब्दाच्या वेळी, तुमचे उघडे हात खाली करा आणि जेव्हा तुम्ही ते वर करता तेव्हा बंद करा.*

3. रूथची इच्छा नव्हती की नामीला एकटे <u>सोडावे</u> आणि तिने नामीला सांगितले, "मी तुमच्या <u>सोबत</u> येते! मी तुमची मुलगी होईल, तुमचे लोक माझे लोक होतील आणि तुमचा देव माझा देव होईल." नामीला समजून आले की रूथ या बाबतीत गंभीर आहे आणि ती आपले मन बदलणार नाही, म्हणून रूथ नामी <u>सोबत</u> बेथलेहेमला गेली(जेथे नामी राहात होती). जेव्हा त्यांना <u>पती</u> नव्हते तेव्हा त्यांना एवढा तरी आनंद होता की त्या सोबत आहेत आणि जगण्यासाठी कोणीतरी त्यांच्या <u>सोबत</u> आहे



*<u>सोबत</u> शब्दाच्या वेळी आपले हात बंद करा, तुमच्या मुठी जवळ ठेवा.*


4. जेव्हा त्या बेथलेहेमात आल्या, तेव्हा शेतक-यांनी सातूच्या हंगामास सुरूवात केली होती, ते सातूचे <u>रोपटे</u> कापत होते. रूथने कापणा-यां माणसांच्या मागून पडलेले सातू गोळा करण्यास सुरूवात केली, कारण तिचे आणि नामीचे पालनपोषण करण्यासाठी तिला <u>पती</u> नव्हता.पवित्र शास्त्र सांगते, धान्य आणि पेंढया ज्या जमिनीवर पडतात, आणि



जी <u>रोपटे</u> शेताच्या कोप-यामध्ये आलेली असतात, ती गरीबांच्या पालनपोषणासाठी ठेवली पाहिजेत, म्हणून तिने पडलेल्या पेंढया उचलल्या. अशारीतीने रूथने हंगामामध्ये <u>रोपटे</u> उचलण्याचे काम केले यासाठी की त्या दोघींना खावयास मिळावे.

*<u>रोपटे</u> शब्दाच्या वेळी, तुमच्या डाव्या हाताच्या बोटांनी गोल तयार करा, जेव्हा तुम्ही तुमचा उजवा हात त्यामधून न्याल*

5. रूथने कापणा-यांच्या मागून बराच वेळ काम केले, तिने उनाची पर्वा केली नाही. नामीने तिला फार <u>चांगले</u> वागवले; तिने रूथची मदत केली होती आणि म्हणून रूथने खात्री केली की ती सुध्दा नामीसाठी <u>चांगली</u> असेल. म्हणून नामीसाठी पुरेसे अन्न आणण्यासाठी तिने खूप कष्ट केले











*चांगले शब्दाच्या वेळी डावा हात मध्यभागी; तुमचा उजवा हात वरून खाली हलवा*



6. ज्या शेतामध्ये रूथ धान्य वेचीत होती ते शेत नामीच्या नातेवाईकाचे होते. त्याचे नाव बवाज होते. जेव्हा बवाजाने तिला काम करतोना पाहिले, त्याने कामक-यांना विचारले, "ही कोण आहे?" कामक-याने त्याला सांगितले, "ती नामी सोबत मवाबावरून आलेली स्त्री आहे. तिने मला विचारले की मी शेतात काम करू शकते का, केवळ वेचणा-यांच्या हातातून पडलेला सरवा मी वेचेल. ती सकाळपासून काम करीत आहे " बवाजाने ऐकले होते की पती मरण पावल्यापासून रूथने नामीला कसे वागविले. बवाजने तिला सांगितले की हवा तितका सरवा ती वेचू शकते आणि कोणी तिला त्रास देणार नाही आणि ती त्याच्या शेतात काम करू शकते

*काम शब्दाच्या वेळी तुमचे हात बंद असतांना तुमच्या उजव्या हाताने तुमच्या डाव्या हाताला स्पर्श करा*

7. रूथने पूर्ण हंगामामध्ये सरवा वेचला. जेव्हा नामीला समजले की ती तिचा नातेवाईक बवाजाच्या शेतात काम करीत आहे, तिने एक बुध्दीमान योजना आखली. योजना अशी होती की ती आणि रूथ आपल्या कुटूंबातील काही शेतीचा काही भाग पुन्हा मिळवितील. नामीने रूथला आपल्या योजनेबाबत सांगितले. परिणामी, बवाजाने नामीची जमिन वापस केली आणि आता नामी आणि रूथ यांना घर मिळाले. बवाजाने रूथसोबत लग्न केले आणि जेव्हा त्यांना मुलगा झाला तेव्हा त्यांनी नामीच्या घरी मेजवाणी दिली. बुध्दीमान योजनेमुळे नामी आणि रूथला पुन्हा घरे आणि परिवार मिळाला.



*बुध्दीमान शब्दाच्या वेळी तुमचे तुमच्या उजव्या हाताच्या बोटाने तुमचे कपाळ खाजवा.*


8. रूथच्या पतीचे निधन झाले होते तरी, तिला समजले की देवाची इच्छा आहे की तिने त्याची आज्ञा पाळावी आणि दुस-या लोकांसाठीचे प्रेम दाखवावे. रूथसाठी तो अवाढव्य निर्णय होता की तिने आपल्या सासूला एकटे सोडू नये, परंतु तिच्या सोबत इस्त्राएलाला वापस जावे. शेतात उरलेले धान्य उचलण्याचे काम म्हणजे काय हे कदाचित तुम्हाला माहित नसेल, परंतु माझी खात्री आहे की तुम्हाला लीोकांसोबत प्रेमाने राहाणे म्हणजे काय हे माहित असेल, ते कठीण असले तरी. जेव्हा तुम्ही दुस-यांवर प्रेम करता तेव्हा देव तुम्हाला आशीर्वाद देईल, कारण ती केवळ करण्यासारखी चांगली गोष्ट आहे असे नाही, परंतु तसे करणे बुध्दीमानी आहे. आपण हे सुध्दा शिकतो की आपल्या कठीण परिस्थितीमध्ये देव आपल्याजवळ असे लोक ठेवतो ज्यांना आपण देवाची प्रीती दाखवावी

# चक्राकार स्थानके

**स्थानंकाकडे जाण्यासाठी लेकरांना तीन गटामध्ये विभागा**

## गॅरेज हस्तकाम

**मोटोक्रॉस गडद चष्मे**



प्रत्येक विद्याथ्र्याला द्या

1 गडद चष्म्याचे चित्र असलेला कागद

1, 18 सेंमी ग 3 .5 सेमी लाल सेलोफेन कागद

50 सेमी रिबन किंवा धागा

- गडद चष्म्यांची पांढरी पाश्र्वभूमि आणि गोल काठावर कापा.
- गडद चष्मे तूमच्या आवडत्या रंगाने रंगवा.
- मागील बाजूला, तुमचया सेलोफेन कागदाची पट्टी चिटकवा, यासाठी की तिने गडद चष्म्याचा मधला भाग झाकला जाईली
- प्रत्येक छिद्र रिबनने बांधा यासाठी की ते विद्याथ्र्यांच्या डोक्यावर बांधले जातील

## फराळ गाडी



**हृदयाच्या आकाराचे सँडविच**

घटक पदार्थ:

- पांढरी ब्रेड
- हृदयाचा आकार कापणारा साचा किंवा मध्यम आकाराचे कागदाचे हृदय
- स्ट्रॉबेरी जामची बॉटल
- चाकू (चाकू नसेल तर बिस्कीट कापण्याचा साचा)
- प्लास्टीकचा चमचा

*सूचना:*

1. वर्गाला पूरतील एवढे हृदयाच्या आकाराचे ब्रेडचे तूकडे कापा.
2. ब्रेडच्या तुकडयाच्या अध्र्या भागावर जाम लावा.
3. जाम लावलेल्या ब्रेडच्या तुकडयावर दुसरा ब्रेडचा तूकडा ठेवा

*तयार!!, आता आपल्याजवळ मजा घेण्यासाठी गोड सँडविच आहे.*


## गाडी चालविण्याचा वर्ग

“गाडी चालविण्याच्या वर्गामध्य” आपले स्वागत आहे, ज्यामध्ये आपण चिद्याथ्र्यांच्या पुस्तकावर काम करणार आहोत. आजचा धडा आणि आजचे वचन पुन्हा बोलून आपण सर्वात करू या का? चला तर सुरू करा!!!









## प्रश्न आणि उत्तरे

1. देव जगातील सर्व दुष्ट लोकांचा नायनाट का करीत नाही?

छेव सर्वांवर प्रीती करतो आणि अपेक्षा बाळगतो की सर्वांनी पश्चाताप करावा आणि त्याच्याकडे वापस यावे . देवाने सर्व दुष्ट लोकांचा नायनाट करावा असे वाटणे फार धोकादायक आहे, कारण आपणा सर्वांच्या हृदयामध्ये दडलेली दुष्टाई आहे, म्हणून आपला सुध्दा नायनाट होऊ शकतो!!

2. आपण सर्वांसोबत मैत्री केली पाहिजे का?

आपण दुस-यांवर प्रेम केले पाहिजे, त्यांच्यासोबत चांगले वागावे आणि सर्वांसोबत मनमिळावूपणे राहावे. असे असले तरी, जर कोणीतरी क्रौर्यानेच वागत असेल तर आपण त्याचे मित्र होण्याची गरज नाही. आपण आपल्या वैं‘यांना प्रेम दाखवावे, परंतु नेहमीच आपण त्यांचे मित्र होण्याची गरज नाही.

3. मला दुस-यांना माझ्याआधी ठेवण्याची खरेच गरज आहे का?

होय, आपण दुस-यांना आपणापेक्षा श्रेष्ट मानावे . तसेच, जर आपल्याला येशूसारखे जगायचे असेल, आपण दुसऱ्या लोकांचे हित आपण आपल्या हिताआधी ठेवले पाहिजे

4. नामीचे घर असलेले गाव कोणते होते?

इस्त्राएल मधील यहूदा प्रांतातील बेथलेहेम.

5. नामीच्या दुस-या सुनेचे नाव काय होते?

अर्पा

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | पा | ठां | त | र | प्रि | ग्न | द् |
| द़ | गो | शे | तो | अ | र | ती | णे |
| ळा | थ्र | ळा | र | नु | प | ध | ऍ |
| स्न | वा | झ्र | क | स | णे | रू | थ |
| ल | आ | आ | हे | र | ळा | र | णे |
| ग्न | ज्ञा | ञ | क | ण | णे | आ | हं |
| क्र | पा | ग्न | क | रा | वी | ट् | गा |
| र | ल | र | बे | थ | ल | हे | म |
| ण | न | द्व | ब्वा | यो | हा | ना | चे |
| ऐ | क | ला | ज | व | ग्न | ळा | णे |

1. नामीच्या पुत्रांना व पतीला काय झाले? ते मरण पावले
2. नामीने रूथ आणि अर्पासमोर काय प्रस्ताव ठेवला? त्यांनी कशाची निवड केली? मवाब देशात मागे राहण्याचा. अर्पा मवाब देशात मागे राहिली. रूथ नामी बरोबर राहिली.
3. रूथ ने प्रिती कशी दाखविली? तिने नामीची काळजी घेण्यासाठी सरवा वेचला.
4. नामीने प्रिती कशी दाखविली? तिने रूथला घरात बोलाविले आणि तिच्या बरोबर राहू इच्छित होती.
5. बवाजाने प्रिती कशी दाखविली? त्याने सोडविणा-या आप्ताशी व्यवहार केला व तिला सोडविले आणि रूथशी विवाह केला.



2

1

3

चित्र क्रमाने लावण्यासाठी
रकाण्यात क्रमांक लिहा



1


2

3

## तयार, तत्पर खेळ!

**धावा! (व्यक्तीगत)**

नेहमी खेळल्या जाणा-या "टॅग" या खेळाचे हे वेगळे रूप आहे. या खेळासाठी क्षेत्र तयार करणे गरजेचे आहे आणि प्रत्येक कोप-यामध्ये विभाग नेमून द्या ज्याचा वापर सुरक्षित क्षेत्र म्हणून करा (तळ किंवा आश्रय).



खेळामध्ये खालील गोष्टींचा अंतर्भाव आहे:

खेळामध्ये भाग घेणारी सर्व मुले खेळाच्या मैदानात असावी. एक मुलाला दुस-यांचा पाठलाग करण्यासाठी निवडले जाते. जेव्हा शिक्षक जोराने बोलतात, "धावा" तेव्हा नेमून दिलेल्या मुलाने सर्वांचा पाठलाग करण्यासाठी धावावे, त्यांना स्पर्श करण्याचा प्रयत्न करावा, जेव्हा असे घडते तेव्हा पाठलाग करणा-याने खेळ सोडावा. प्रत्येकाने धावले पाहिजे, सुरक्षित जागा पाहावी (तळ किंवा आश्रय), कारण त्या जागी ते सुरक्षित राहातील आणि त्यांना खेळामधून काढून टाकण्यात येणार नाही . सर्वजण सुरक्षित क्षेत्रामध्ये गेल्यावर तर शिक्षकांनी पुन्हा जोराने म्हणावे, "धावा". प्रत्येकाने सुरक्षित जागा सोडावी आणि वेगवेगळया आश्रय जागेकडे जावे. जर ते त्याच जागी राहीले, तर त्यांना खेळ सोडावा लागेल. जर त्यांनी आखलेली रेघ किंवा मर्यादा सोडली, तर त्यांनी सुध्दा खेळ सोडून द्यावा. जो मुलगा किंवा मुलगी खेळातून बाहेर गेली नाही ती विजयी ठरेल.

विजयी चमूला गूण मिळतील


**झाडू फूटबॉल (चमू)**







या खेळासाठी तुम्हाला भाग घेणा-या 2 सहभागी चमू लागतील, 1 झाडू आणि एक चेंडू
2 गोल क्षेत्र तयार करा आणि ते एकेका चमूला नेमून द्या.
2 चमू एकमेकांसमोर उभे राहातील आणि खेळाडूला नंबर देण्यात येईल.
खात्री करा की दोन्ही चमूमधील खेळाडूंची संख्या सारखीच आहे.
चेंडू आणि झाडू मैदानाच्या मध्यभागी ठेवण्यात येतील.
जेव्हा पुढारी जोराने नंबर सांगतो, त्या संघातील तो नंबर असलेली लेकरांनी धावावे, झाडू घ्यावा आणि चेंडू प्रतिस्पर्धी गोलमध्ये टाकण्याचा प्रयत्न करावा.
चेंडूला केवळ झाडूनेच स्पर्श करावयाचा आहे.
गोल केल्यावर झाडू आणि चेंडू मध्यभागी आणून ठेवावा.
सर्वजण खेळेपर्यंत पूढारी नंबर बोलत राहातील.
जी चमू जास्त गोल करील ती विजयी ठरेल.
लक्षात घ्या: जर तुम्हाला झाडू वापरायचा नसेल, तर नेहमीप्रमाणे खेळतात तसा फूटबॉल खेळा



## निष्कर्ष

व्हीबीएस मधील दिवस किती छान होता! आज आपल्याला खूप मजा आली आणि आपण शिकलो की रूथने तिच्या आजूबाजूला असलेल्या लोकांवरील प्रीती कशी व्यक्त केली, दुस-यासांठी जगली आणि स्वःताची पर्वा केली नाही. आपण शिकलो की असे वागणे आपल्या गाडीमध्ये उष्णता निरोधक टाकण्यासारखे आहे, ज्याकडून राग, स्वार्थ, भांडणे आणि गैरसमजामुळे गाडी तापणार नाही. आपल्याला तो “थंडावा निर्माण करणारा” भाग आपल्या जीवनामध्ये टाकावा लागेल, यासाठी की आपण शर्यंत जिंकावी.

# 4 सामथ्य्र्र समजून घेणे

पवित्र शास्त्रातील गोष्टः दानीएल सामथ्र्याचा अनुभव घेतो / दानिएल 6:1-28



## वचन

*"मुलांनो, तुम्ही देवाचे आहात आणि त्यांच्यावर तुम्ही जय मिळवला आहे; कारण जगात जो आहे त्याच्यापेक्षा तुमच्यात जो आहे तो मोठा आहे."1 योहानाचे 4:4*

## नाटक

**मॅकॅनिक आणि अति पवित्र शास्त्रीय**

• मॅकॅनिक चालत आहे आणि टपाल कार्यालयातून आलेली पेटी उचलत आहे. ती एक मोठी पेटी आहे, जिला बरेच भाग आहेत, ज्यामध्ये मोटार आणि गॅस पंप सुध्दा आहेत. पंप एका गि-हाईकासाठी आहे ज्याने आपली मोटार सायकल आणली आहे, असे सांगितले की त्याचा गॅस पंप तूटला आहे आणि त्याला नविन गॅस पंप पाहिजे आहे

• तो निरोशेने हसू लागतो. मग तो पाहातो की अतिमहान नट स्वःतासोबतच बोलत आहे. तो अंदाज बांधतो की तो कोण असेल आणि पेटी आणि तीच्यामधील मोटार सायकलचे सुटे भाग पाहातो

> **लक्ष वेधक**
>
> बोलणारः 'ब्रेक मारा!'
> मुलंः ब्रेक दोनदा मारा.
> 'इर इररररर!' ब्रेकचा आवज, हालचाल अशी असेल, पंजा सरळ बाहेर, मग दुसरा हात त्यानंतर पहिला हात.
> 'ऐकण्यासाठी तयार!' एका कानाकडे हात लावा, दुस-या कानाकडे, आंगठा वर.

• नामांकीत नट, जो मने वाचू शकतो, म्हणतो, "मी अति पवित्र शास्त्रीय आहे आणि मी सुटीवर आहे." ते काही वेळ बोलतात आणि मॅकॅनिक त्याची स्वाक्षरी मागतो. अति महान व्यक्तीकडे क्ष किरणीय दृष्टि असल्यामुळे पेटीमध्ये काय आहे हे तो पाहातो

• मॅकॅनिक अतिमहान व्यक्तीचा निरोप घेतो, पेटी उचलण्याचा प्रयन्त करतो, परंतु ती फार जड आहे. आपल्या पूर्ण शक्तीनिशी पेटी उचलण्याचा प्रयत्न करतो, आपल्या पायाने आणि जी पण पध्दत त्याच्या मनात आली त्याप्रमाणे पेटी उचलण्याचा प्रयत्न करतो. त्याला माहित आहे की अति महान व्यक्तीला विनंती केली तर तो ती पेटी उचलू शकतो. मॅकॅनिकला अति महान व्यक्तीची मदत ध्यायला नको कारण तो अतिमहान सुटीवर आहे. पुन्हा पेटी सरकविण्याचा प्रयत्न करतो तेव्हा तो पेटी थोडीशी हलवतो आणि मॅकॅनिकचा बोट पेटीखाली चेपतो आणि तो वेदनेने ओरडायला सुरूवात करतो. शेवटी, तो ठरवितो की तो पेटी उचलू शकता नाही आणि अति महान व्यक्तीला निरोप देतो.







• जाण्यापूर्वी, अति महान व्यक्ती विचारते की गॅस पंपाबाबत असे काय मनोरेजक आहे. मॅकॅनिक सांगतो की त्याच्या लक्षात आले आहे की मोटार सायकलमधील गॅस संपलेला आहे आणि तिला नविन गॅस पंपची गरज नाही. ते दोघेहि गरीब गिःहाईकाला हसतात, ज्याने पूर्ण महिना मोटार सायकल शिवाय घालविला आहे

• मॅकॅनिक निघून जातो कारण तो ती पेटी उचलू शकत नाही. अति महान व्यक्ती बाहेर आल्यावर, तो अगदी सहज पेटी उचलतो आणि म्हणतो, "ही खरी गंमत आहे की त्याने मदत मागायला पाहिजे होती."

## संदेश

"आपले इंजिन सुरू करा" व्हीबीएसमध्ये आपले पुन्हा स्वागत आहे!

आपण संपवण्याच्या बेतात आहोत, म्हणून आपल्याला हे समजणे जरूरी आहे की कोणामध्ये शक्ती आहे आणि कोणामध्ये शक्ती नाही. आज आपण शक्तीबाबत बोलणार आहोत! ती शक्ती जी शर्यतीच्या मोटार सायकल्सना जोराने धावायला लावते, ती शक्ती आहे गॅसोलीन (पेट्रोल). त्याशिवाय, मोटार सायकल्स सुंदर असतील, परंतु त्या जागेवरच उभ्या राहातील, समोर जाणे त्यांना जमणार नाही. आपणा सर्वांना माहित आहे की पेट्रोल मोटार सायकलच्या टाकीत साठविले जाते आणि समोर जातांना मोटार सायकल पेट्रोल वापरते. कधीतरी, मोटार सायकलमधील पेट्रोल संपून जाईल आणि ती थांबेल, जर पेट्रोल भरले नाही तर. ख्रिस्ती जीवनामधील सामर्थ्य हे गाडीतील पेट्रोल सारखे आहे. देवच आपल्याला समोर जावू देतो आणि आपल्याला शक्ती देतो. हे समजणे फार चांगले आहे की आपण आपल्या स्व शक्तीने ओढले जात नाही. ज्या सर्व गोष्टींमुळे जीवन आनंददायी वाटते त्या गोष्टी आपल्याला देवासोबत जोडून ठेवतात. जीवनाच्या शर्यतीमध्ये एखाद्या ठिकाणी थांबणे बरोबर होणार नाही, केवळ त्या कारणामुळे की तुमचे पेट्रोल संपले!



पवित्र शास्त्रातील एक अतिशय अद्भूत तत्व हे आहे की आपल्याला आपले ख्रिस्ती जीवन आपल्या शक्तीने जगण्याची गरज नाही - आणि खरेतर आपण तसे जगूहि शकत नाही! गलती 2:20, सांगते, *"यापुढे मी जगतो असे नाही तर ख्रिस्त माझ्या ठायी जगतो."* आणि पौल ही समस्या स्पष्टपणे रोम 7 मध्ये मांडतो, *"मला हया मरणाधीन असणा-या देहापासून कोण सोडविल? आपला प्रभू येशू ख्रिस्त हयाच्याद्वारे मी देवाचे आभार मानतो."* आपल्याला देवासाठी परिपूर्ण जीवन जगण्याची कामगिरी देण्यात आली आहे, जरी चोहोबाजूंनी पाप आपल्याला मोहात पाडत असते. यातील सुंदरता ही आहे की देव आपल्याला ओळखतो, आपल्या अशक्तपणामध्ये सुध्दा; आणि तो आपल्यावतीने आपली मदत करतो! आपल्या समोर ठेवलेली कामगिरी पूर्ण करण्यासाठी तो आपल्याला शक्ती देतो. तो आपल्या वतीने आपल्या शत्रूसोबत लढतो; तो आपल्या अग्रगामी जातो आणि युध्दामध्ये आपले मार्गदर्शन करतो. आपण त्याच्या शक्तीवर विसंबून राहू शकतो! हे सुध्दा माहित असणे आनंददायी आहे की आपला परमेश्वर बाकी सर्व देवांपेक्षा सर्वसमर्थ आहे, आणि आपला शत्रू सैतान आणि त्याच्या सर्व दुरात्म्यांपेक्षा सामर्थ्यवान आहे. परमेश्वराने सैतानाला पृथ्वीवर फिरण्याची तात्पुरती परवानगी दिली आहे, परंतु देव आजहि सर्वसमर्थ आहे. तो अजूनहि दुस-या कोणाहिपेक्षा सामर्थ्यवान आहे, जरी त्याने जगामध्ये सैतानाला थोडीशी शक्ती दिलेली आहे. आपले आजचे पाठांतर वचन जाहीर करते, "कारण जगात जो आहे त्याच्यापेक्षा तुम्हात जो आहे तो







मोठा आहे." आज आपण दानिएलाला भेटणार आहोत, पवित्र शास्त्रामधील मनुष्य ज्याने देवाची सामध्र्य कार्य करतांना पाहिले!

आपल्यामधी देवाचे सामथ्र्य किंवा पेट्रोल कधीहि संपू नये, परंतु देवासोबत संयुक्त होण्याची आपण आठवण ठेवली पाहिजे! काही मार्ग ज्याकडून आपण देवासोबत जोडलेले राहू शकतो ते आहेत, प्रार्थना, शास्त्रवाचन, भक्तीला जाणे, आणि जे आपली साक्ष देतात त्यांचे ऐकणे . सर्वात उत्तम मार्ग आहे देवापासून सरळ तुमच्याकडे. तुम्ही तुमच्या पेट्रोलची टाकी इतक्यात भरली आहे का?

## थंडावा दूर करणारा खेळ

### गुप्त चिन्ह

खेळाडू नंबर निवडतात, 1,2,3,4 किंवा 5.

त्यांनी कोणता नंबर निवडावा हे सांगणारा कोणी नाही; प्रत्येक जण एक सेकंद विचार करतो आणि नंबर निवडतो. आपला नंबर खेळणा-यांना जोराने सांगावयाचा नाही.

खेळाडू आपली जागा सोडतात, मिसळतात आणि एकमेकांच्या हातात हात देतात आणि काहीच बोलत नाही. लेकरे गट तयार करतात जेव्हा ते आपल्यासारखा नंबर असलेले दुसरे लेकरे शोधतात. आठवण ठेवा की हा खेळ निशब्द खेळ आहे. जर खेळाडूने 1 नंबर निवडला असेल, तर तो एकदाच हस्तांदोलन करील. जर तुम्ही 3 नंबर निवडला असेल तर तुम्ही तीन वेळा हात दाबावा आणि वाट पाहावी की दुस-या खेळाडूने तुमचा हात हातात घ्यावा, हे समजण्यासाठी की तुमचा आणि त्याचा नंबर सारखाच आहे. जर नंबर सारखा असेल तर ते एकत्र येतील आणि तोच नंबर असलेल्या दुस-यांची वाट पाहातील. खेळाडूनी काहीच बोलू नये. जो गट सर्वप्रथम एकत्र येईल तो विजयी होईल

## पवित्र शास्त्रातील धडा

### दानीएल सामथ्र्य अनुभवतो

1. दानीएल तरूण मनुष्य होता ज्याला राजाची सेवा करण्यासाठी महालात नेण्यात आले होते आणि जे काही तो करीत होता त्यामध्ये तो इतका चांगला होता की तो एक अधिकारी झाला. तो प्रामाणिक होता आणि त्याला देवासोबत बोलायला आवडत होते. तो रोज आपल्या खोलीच्या खिडक्या उघडया ठेवून देवाची प्रार्थना करीत होता; तो दिवसातून तीनदा प्रार्थना करीत होता आणि तो केवळ जेवणासाठी प्रार्थना करीत होता असे नाही.



*देव शब्दाच्या वेळी तुमच्या उजव्या हाताचा बोट वर करा, मग तुमचा हात उघडा, जेव्हा तुम्ही तो तुमच्या छातीसमोरून हालवता*



2. दारयावेश राजा दानीएल जे चांगले काम करीत होता त्याबाबत फार संतूष्ट होता आणि त्याने ठरविले की दानीएलाला सर्वस्व गोष्टींचा अधिकारी करावे. अधिका-यांमधील काहीजणांना फार राग आला की दारयावेश राजाने दानिएलाला व्यवस्थापक केले आहे. (रागावलेल्या मनुष्यांचे चेहरे काढा). रागावलेल्या लोकांनी दानीएलावर पाळत ठेवली की त्याच्यामध्ये काहीतरी उणीव सापडेल आणि राजा

त्याला विशेष वागणूक देणार नाही, परंतु त्यांना काहीहि चूकीचे आढळले नाही! जेव्हा त्यांनी दानीएलाला दिवसातून तीनदा आपल्या देवाची प्रार्थना करतांना पाहिले, त्यांना मोठी कल्पना सूचली. (त्यांच्या डोक्याच्या वर एक बल्ब काढा)

*राग शब्दाच्या वेळी, तुमच्या उजव्या हाताची बोटे दुप्पट करा आणि त्यांना तुमच्या चेह-यापासून दूर न्या.*



3. अधिका-यांनी शहाणपणाने दारयावेश राजाला नविन कायदा करण्यास सांगितले. कायद्यात असे होते की 30 दिवस कोणीहि दारयावेश राजा सोडून दुस-या कोणत्याहि देवाची प्रार्थना करणार नाही. जी व्यक्ती ही आज्ञा मोडेल तिला सिहाच्या गूहेमध्ये टाकण्यात येईल आणि सर्वांना माहितच आहे की कोणाचाहि भूकेल्या सिहाच्या गुहेमध्ये निभाव लागणार नाही. रागाने भरलेल्या अधिका-यांची खात्री होती की सिंह दानीएलाला खातील. त्यांनी स्वःताला सुध्दा विचारले की दानीएल देवाची प्रार्थना करणे थांबवेल का.

*सिह शब्दाच्या वेळी तुमचा वाकवलेला उजवा हात हलवा; तो पाठीमागे न्या आणि हलवा*

4. ताबडतोब, दानीएलाने नविन कायद्याबाबत ऐकले. दानीएल आपल्या खोलीमध्ये लपून राहू शकता असता, किंवा दिसू नये म्हणून खिडक्या बंद करू शकला असता किंवा ते 30 दिवस देवाची प्रार्थना करणे थांबवू शकला असता.



परंतु दानीएलासाठी प्रार्थना फार महत्वाची होती, ज्याने पूर्वीप्रमाणेच देवाची प्रार्थना करणे सुरू ठेवले (दिवसातून तीन वेळा आणि खोलीच्या खिडक्या उघडया ठेऊन). त्या रागाने भरलेल्या अधिका-यांनी ते पाहिल्याबरोबर, ते ती बातमी सांगण्यासाठी राजाकडे गेले, की दानीएलाने कायदा मोडला आहे

*कायदा शब्दाच्या वेळी, खूण केलेले तुमचे उजव्या हाताची बोटे तुमच्या डाव्या हातावर खालपर्यत फिरवा.*

5. दारयावेश राजाला फार राग आला, दानीएलाने कायदा मोडला म्हणून नाही, परंतु अधिका-यांनी धूर्तपणे दानीएलाला दोषी ठरविण्यासाठी आपल्याला फसविले आहे यासाठी राग आला. सैतानाने त्यांचा वापर केला होता आणि असे भासत होते की ते विजयी होतील. बाबेलमध्ये, राजाने एकदा द्वाही मंजूर केली की ती पाळावी लागत होती आणि बदलता येत नव्हती. दारयावेश राजाला समजले की त्याचा मूर्ख कायदा पूर्ण करावाच लागेल आणि कोणीहि प्रार्थना करू शकणार नाही. फार दुःखाने तो सिंहाच्या गुहेकडे दानीएलाकडे गेला.



*प्रार्थना शब्दाच्या वेळी, तळच्यांना समोर स्पर्श करा, तूमचे हात तुमच्या शरीराकडे वळवा आणि तुमचे मस्तक लववा*







6. दारयावेश <u>राजाने</u> दानीएलाला अलिंगण दिले आणि त्याला सांगितले, "मी आशा धरतो की तुझा <u>देव</u> या भूकेल्या सिंहांपासून तुझा बचाव करील." आणि त्यानंतर दानीएलाला <u>सिंहाच्या</u> गूहेमध्ये फेकून देण्यात आले. त्यांनी सिंहाची गूहा बंद करण्यासाठी गूहेच्या तोंडावर मोठा धोंडा लोटला, आणि राजाने दगडावर शिक्का मारला यासाठी की कोणीहि तो तोडू नये. त्या रात्री, <u>राजाला</u> दानीएलाबाबत फार काळजी वाटत होती, तो झोपू सुध्दा शकला नाही. त्याने ती पूर्ण रात्री आपल्या खोलीमध्ये फिरण्यात घालविली, विचार करीत राहीला की <u>देव</u> दानीएलाला वाचविण्यासाठी समर्थ असेल का. फार सकाळी, राजा गुहेकडे धावला, त्याने शिक्का बाजूला केला, प्रवेशद्वार उघडले आणि दानीएलाला आरोळी मारली, "दानीएला, <u>देवाने</u> तुला वाचविले आहे का?" आणि मग त्यानं गूहेतून आवाज ऐकला, "होय <u>देवाने</u> मला <u>सिंहापासून</u> वाचविले आहे." त्याने आपल्या दूतांना <u>सिहांची</u> तोंडे बंद करण्याची आज्ञा दिली . राजाने शिपायांना आज्ञा केली की दानीएलाला <u>सिंहाच्या</u> गूहेतून बाहेर काढावे. दारयावेश राजाने त्या दिवशी आणखी एक द्वाही केली, जिच्यामध्ये म्हटले होते की दानीएलाचा <u>देवच</u> खरा देव आहे. मग त्याने <u>रागीष्ट</u> अधिका-यांना शिक्षा केली.



*<u>राजा</u> शब्दाच्या वेळी अंगठा पहिल्या आणि मधल्या बोटामध्ये ठेवा, खांद्यापासून कमरेपर्यंत हलवा.*

# चक्राकार स्थानके

**तीन गटांमध्ये विभागणी करा आणि स्थानकांकडे जा**

## गॅरेज हस्तकाम

प्रत्येक विद्याथ्र्याला वाटा:


एक पेट्रोलच्या टाकीचे चित्र .

1 नोझल

2 कागदी हात

1 रिबन 35 सेंमी

1 काळा पाईप स्वच्छ करण्याचे साधन, त्याला तीन सारख्या भागामध्ये कापा.




• तुमच्या विद्याथ्र्यांना तुकडे त्यांच्या आवडत्या रंगाने रंगविण्यास सांगा.

• पाईप साफ करण्याचे दोन तुकडे डिंकाने जोडा यासाठी की ते हातासारखे दिसावेत आणि टोकाला दोन हात चिटकवा.

• दुसरा पाईप स्वच्छ करण्याचा तुकडा मागे खाली चिटकवा आणि दुस-या टोकाला नोझल चिटकवा.

• रिबनचे चार तुकडे कापा आणि त्यांना पाठीमागे केसाप्रमाणे चिटकवा. तसेच तुम्ही कात्रीने वरील भागी रिबत कापू शकता यासाठी की ते आणखी चांगले दिसावे.

## फराळ गाडी



सुगंधित पाण्याची बाटली

*घटक पदार्थ:*

- 200 मिली पाण्याची एक बाटली
- पाण्यात मिसळण्यासाठी जमेकन चविचे पाकीटे जसे की टँग इत्यादी
- काळया आणि पांढ-या पट्टया असलेला एक कागद (6 सेमी बाय 15 सेंमी)
- ग्लू स्टिक किंवा तुमच्याजवळ असलेला कोणताहि डिंक
- पर्यायी - असेल तर फराळ

सूचना:

1. पाण्याची बाटली उघडा
2. सुगंधी पाकीट उघडा
3. काही सुगंधी पावडर पाण्याच्या बाटलीमध्ये टाका, बंद करा आणि बाटली एकसारखी हलवा
4. कागदाचा तुकडा बाटलीच्या मध्यभागी चिटकवा
5. पर्याय - असेल तर लेकरांना पाण्यासोबत फराळ द्या

गमतीच्या फराळाचा आस्वाद घ्या

## गाडी चालविण्याचा वर्ग

"गाडी चालविण्याच्या वर्गामध्ये" आपले स्वागत आहे ज्यामध्ये आपण विद्यार्थ्यांच्या पुस्तकावर काम करणार आहोत. आजचा धडा आणि वचन म्हणून वर्गाला सुरूवात करू या. चला तर मग सुरू करू!!!

बिंदू जोडा
दानीएल आणि सिंहाचे तोंड काढा
सिंहांच्या शेवटया काढा
दानीएलाच्या मागे सिंहांच्या गुहेच्या भिंती काढा



तुम्ही दानीएल आहात अशी कल्पना करा आणि लिहा:

उत्तरं वेगवेगळे असू शकतात परंतू तरी सुध्दा बरोबर असू शकतात. इथ काही उदाहरण आहे.

5 गोष्टी ज्या तुम्ही पाहू शकता:
- गुहेच्या भिंती
- सिंह
- राजा
- सिंहांचे दात
- बाहेर पडण्याचा रस्ता नाही.

4 गोष्टी ज्याला तुम्ही स्पर्श करू शकता:
- सिंहाची दाढी
- दगडाच्या भिंती
- घामपुसण्यासाठी माझा चेहरा
- माझ्या पायाचे बोटं

3 गोष्टी ज्या तुम्ही ऐकू शकता:
- सिंहाचे घोरणे
- बाहेरचा वारा
- माझा घाबरलेला श्वास

2 गोष्टी ज्याचा तुम्ही वास घेउ शकता
- माझा घाम
- सिंहांचा दुर्गंध!

1 गोष्ट ज्याचा तुम्ही विचार करत आहे:
- माझा देव खूप सामर्थ्यशाली आहे!

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सिं | धो | की | गु | धै | धो | का |
| ह | प्रा | र्थ | ना | हा | द | सा |
| र | न | ध | सु | र्य | व | गु |
| धै | रा | मू | र्ती | र | न | ह |
| आ | र्य | की | भ | दे | क्षि | र्ती |
| न | ड | वा | दे | व | दू | त |
| खि | र | ती | न | र | धै | सिं |
| र्ती | दा | नी | ए | ल | र्य | हा |







## प्रश्न आणि उत्तरे

1. देव फार दूर आहे असे जर मला वाटले तर?

देवावर विश्वास ठेवण्यासाठी विश्वासाची गरज असते जेव्हा आपण त्याला पाहू शकत नाही किंवा त्याला स्पर्श करू शकत नाही. असे असले तरी, आपल्याला काहीहि वाटले तरी, देव तेथे आहे, आपल्यावर तो प्रीती करतो आणि आपली काळजी धेतो.

2. देव वाईट गोष्टी का घडू देतो?







आपल्या आध्यात्मिक वाढीसाठी आणि आपण दुस-यांना मदत करावी म्हणून (आपण जर त्याच समस्येमधून गेलो नाही तर आपण जास्त मदत करू शकत नाही). जेव्हा पाप जगात शिरले तेव्हा त्याचा सर्वांवर परिणाम झाला. देवाने खिस्ती लोकांभोवती मोठी भित उभारली नाही. आपण सर्वजण या जगात राहातो, आपणा सर्वांची एकच पृथ्वी आहे, आणि आपण दुस-यांसाठी उपलब्ध राहीलो पाहिजे आणि त्यांची मदत केली पाहिजे.

3. तुम्हाला कोणत्या गोष्टींची भिती वाटते?

वेगवेगळया गोष्टींबाबत बोला, कोळयापासून दुस-या शाळेमध्ये जाण्यापर्यंत. त्यांना निवांत वाटावे असा प्रयत्न करा यासाठी की ते आपल्या भितीबाबत सांगू शकतील. प्रत्येक भितीबाबत उत्तर मिळवू नका, केवळ ऐका आणि त्यांना सांगू द्या

4. दानीएलाला सिंहाच्या गुहेमध्ये टाकल्यावर दारयावेश राजाने काय केले?

उपास केला

5. दानीएलाला गुहेतून बाहेर काढल्यावर सिंहाच्या गुहेमध्ये कोणाला टाकण्यात आले?


ज्यांनी दानीएलावर दोषारोप केला होता त्या मनुष्यांना

## तयार, तत्पर, खेळ!

### काळा झेंडा (व्यक्तीगत)

(लंडन पूलासारखा खेळ)

1. लेकरे जास्तीत जास्त मोठे वर्तूळ तयार करतील.
2. समोर आणि दोन लेकरे हातात हात घेतील, आपले हात उंचावतील आणि पूल तयार करतील किंवा बोगदा तयार करतील
3. संगिताच्या तालावर, लेकरे घडयाळाच्या काटयांच्या दिशेने चालतील, बोगद्यामधून.
4. खेळ घेणारा जेव्हा म्हणेल, "काळा झेंडा" तेव्हा संगित थांबेल. जे दोन लेकरे बोगदा करून उभे आहेत ते आपले हात खाली करतील, एका लेकराला पकडतील.
5. जेव्हा दोन लेकरे पकडले जातील तेव्हा ते आधीच्या लेकरांचा दुसरा बोगदा तयार करतील.
6. जोवर जिंकणारा एकजण उरत नाही तोवर बोगदे तयार करणे सुरूच राहील




लक्षात घ्याः संगिताच्या तालामध्ये बदल करून तुम्ही हया खेळामध्ये आणखी मज्जा आणू शकता. दिशा बदलतांना, एका पायावर उडी मारा, लहान उडया मारा, मागे चाला इत्यादी

### सुरक्षित विभाग चमू (चमू)

सर्व चमू भाग घेतील. प्रत्येक चमूला एक फूगा द्या. प्रत्येक चमूमध्ये सारखेच खेळाडू असावेत. प्रत्येक चमू ओळीमध्ये ठेवली जाईल आणि दोन चमूमध्ये थोडे अंतर ठेवा.

जे‍ेव्हा अधिक्षक सुरू करण्यास सांगतात तेव्हा ते फुगा समोरून मागे देतील. पहिला खेळाडू फूगा आपल्या डोक्यावरून देईल, दुसरा पायाखालून, अशाप्रकारे फूगा शेवटपर्यंत पोहोचेल तोवर खेळत राहावे.



जेव्हा शेवटच्या व्यक्तीकडे फूगा येईल, ते मागे चालतील, डोळे बंद करतील आणि रांगेच्या सुरूवातील येण्याचा प्रयत्न करतील. चमूने केवळ दिशेचे नाव घेउन मदत करावयाची आहे.

व्यक्ती रांगेच्या समोर आल्यावर सायकल पुन्हा सुरू करा.

जी चमू लवकरात लवकर सर्व खेळाडू समोर आणील ती विजयी ठरेल.

## निष्कर्ष

आपला व्हीबीएस चा दिवस किती आनंदाचा होता! देवाने दानीएलाला कसे वाचविले हे शिकण्यात आपल्याला किती मज्जा आली! तशाच प्रकारे, आपल्या इंजिनमध्ये "पेट्रोल" असल्याशिवाय, देवाच्या सामर्थ्याशिवाय, आपण कुठेहि जाऊ शकत नाही! परंतु आपल्या अंतर्यामात असलेल्या येशूच्या शक्तीने आपण देवासाठी अद्भूत गोष्टी करू शकतो, आपल्याला शक्य असेल त्याप्रमाणे शर्यत जिंकण्यास धावू शकतो.







# 5 नाकारता न येणारे तारण

## पवित्र शास्त्रातील गोष्ट: येशू आपले तारण करतो / मत्तय 27:32 - 28:10



### वचन

*“देवाच्या पुत्राच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्या तुम्हांला सार्वकालिक जीवन लाभले आहे हे तुम्हांला कळावे म्हणून मी हे तुम्हांला लिहिले आहे. (आणि तुम्ही देवाच्या पुत्राच्या नावावर विश्वास ठेवीत राहावे).” 1 योहानाचे 5:13*

### नाटक

**गाडीचालक**

• मॅक्स शर्यतीत भाग घेणारा आहे आणि तो एका महत्वाच्या शर्यतीमध्ये भाग घेत आहे. तो आपल्या रेडिओवर शर्यतीच्या तपशीलाबाबत शर्यत प्रमुखासोबत बोलत आहे. मॅक्स म्हणतो, “होय, ठीक आहे, मी आता एका पल्ल्यासाठी गाडी हळू नेणार आहे.” तो आरशात पाहातो आणि वेग बदलतो आणि हळू जातो

• त्याच वेळी, दुसरा मॅकॅनिक ज्याला आपण ओळखतो, तो मॅक्सच्या मॅकॅनिकच्या जवळ आहे, आपले डोके बरेच वेळा वर करण्याचा प्रयत्न करतो, यासाठी की लेकरांना तो दिसावा, परंतु तो काळजी घेतो की मॅक्सच्या मॅकॅनिकने त्याला पाहू नये. मॅक्स परिस्थितीचे निरीक्षण करतो आणि प्रमुख मॅकॅनिकला काय करावयाचे ते सांगतो

• लपलेला मॅकॅनिक दुसरा रेडिओ धेतो आणि संभाषण थांबवतो, मॅक्सला आपले मत जोराने सांगतो, जेव्हा मॅकस पाहात आहे. मॅक्स घाबरतो आणि आपल्या मॅकॅनिकसोबत संपर्क साधण्याचा प्रयत्न करतो की दुसरे कोणीतरी रेडिओवर बोलत आहे

> **लक्ष वेधक**
>
> तुमचे तारण कोण करतं?
>
> मुलं: टाळी, टाळी, टाळी, टाळी
>
> ‘येशू!’ उवजीकडे व डावीकडे बोट दाखवा.

• मॅकॅनिक गरीब मॅक्सला सूचना देउ लागतो, जो आपल्या प्रमुखाचे ऐकण्याचा प्रयत्न करीत आहे आणि त्याला त्याचे बोलणे समजत नाही कारण तो एका वेळी दोन लोकांसोबत बोलत आहे

• दुसरा मॅकॅनिक असे बोलतो जणूकाय त्याला शर्यतीचा तपशील माहित आहे आणि मोटार सायकल कशी हाताळावी हे त्याला माहित आहे, परंतू नेहमी शर्यतीमध्ये भाग घेणारा म्हणून मॅक्स त्याला आपला अनूभव सांगतो आणि तसेच त्याच्या कार मॅकॅनिकच्या अनुभवाबाबतहि सांगतो. दुसरा मॅकॅनिक म्हणतो मला सुध्दा माहित आहे, त्याने दूरदर्शनवर पुष्कळ शर्यती पाहिलेल्या आहेत आणि तोहि मॅक्सच्या बॉससरारखाच मॅकॅनिक आहे

• नाटकाच्या या क्षणी, दुसरा मॅकॅनिक असे दाखवितो की तो फार धंदेवाईक आहे परंतु तो आपला आवाज प्रमूख मॅकॅनिकच्या आवाजा एवढा वाढवितो, यासाठी की मॅक्सने केवळ त्याचेच ऐकावे.

• मॅक्स जोरात ओरडून सांगतो की आता तो सहन करू शकत नाही आणि दुस-या मॅकॅनिकला सांगतो की तो केवळ प्रमुख मॅकॅनिकचा सल्ला ऐकणार आहे, दुस-या कोणाचाहि सल्ला ऐकणार नाही. असे सांगून मॅक्स त्याच्याकडे जातो







आणि त्याच्या हातातील रेडीओ काढून धेतो. वेगाने, दुसरा मॅकॅनिक मॅक्सची स्वाक्षरी मागतो. मॅक्स त्याच्यावर खेकसतो आणि लगेच शर्यतीकडे वळतो.

## संदेश

मोटार सायकल शर्यतीमध्ये हे फार महत्वाचे आहे की चमूला एक कर्णधार आहे. गाडीचे मालक असतात, प्रायोजक असतात आणि त्यांच्या चमूचा एक कर्णधारहि असतो. या व्यक्तीची निवड काळजीपूर्वक केली जाते, त्याचे कौशल्य आणि ख्याती लक्षात घेउन. चांगली मोटार सायकल चांगल्या कर्णधारावाचून जिंकू शकत नाही कारण तो शर्यतीत भाग घेणा-यांना योग्य ते निर्णय धेण्यासाठी मदत करतो आणि त्याला पूर्ण चित्र दिसते. हे आपल्या ख्रिस्ती जीवनासोबत कसे लागू पडते?



आज आपण तारणाविषयी शिकणार आहोत. येशूच्या तारणाची देणगी स्विकारणे म्हणजे काय? त्याचा अर्ब आहे आपण आपले जीवन त्याच्या हातामध्ये देणे. त्याचा अर्थ आहे की आपण त्याला आपल्या जीवनाचा प्रमुख व्हावे अशी विनंती करतो. आपल्या चमूचा कर्णधार व्हावे म्हणून त्याला विनंती करणे अशासारखे ते आहे. आपण विनंती करतो की त्याने आपल्या जीवनाची जबाबदारी घ्यावी, यासाठी की आपण आपले भविष्य यांगल्यारीतीने नियंत्रीत करू शकू. देवाने आपल्याला निर्माण केले आणि येथे पृथ्वीवर ठेवले, परंतु आपल्याल आजूबाजूला पाप आहे. जरी आपल्याला वाटत नाही तरी आपल्यापैकी बरेच जण रोज पाप करतात, लहान पापापासून मोठया पापापर्यत. पवित्र शास्त्र सांगते की पापाचे वेतन मरण आहे(रोम 6:23) . तर आपले काय होणार आहे?

जेव्हा आपण चूकीच्या गोष्टी करतो तेव्हा त्याचा अर्थ असा नाही की तुम्ही त्याच घटकेला मरण पावाल! त्याचा अर्थ आहे जेव्हा आपण मरू तेव्हा वाईट कामासाठी आपला न्याय केला जाईल, आणि आपल्याला सैतानासोबत शिक्षा होईल. हे भीतीदायक वाटते, परंतु आपण कल्पना करतो त्यापेक्षा हे जास्त गंभीर आहे!

असे असले तरी, देवाने आपल्या दयेस्तव योजना बनविली. त्याने आपल्या पुत्राला वधस्तंभावर मरण पावण्यासाठी आणि आपल्या पापाची किंमत चूकविण्यासाठी पाठविले. त्याचे मरण आपल्या जागी होते! वास्तविक, आज आपण ही प्रभावी गोष्ट ऐकणार आहोत!

परंतु आपण काय करू शकतो? आपल्याला केवळ आपली पापे स्विकारायची आहेत आणि विश्वास ठेवायचा की येशू तो आहे जे तो म्हणतो, देवाच पूत्र. जेव्हा आपण आपली पापे पदरी घेतो आणि विश्वास ठेवतो, आपल्याला त्याचे बक्षिस मिळते - तारण! त्याचा अर्थ आहे नरकाच्या सार्वकालीक शिक्षेपासून आपला बचाव झाला आहे आणि आपण स्वर्गामध्ये आनंद करू, येशूसोबत, अनंतकाळासाठी!

ही एक महान बातमी आहे!

तुम्ही कधी काहीतरी दिले आणि पुन्हा घेतले आहे का? आपण देवाबाबत असे नेहमीच करतो. आपण म्हणतो, ‘‘तू जे काही सांगशील ते सर्व मी करीन,’’ मग आपण शाळेला जातो, आणि त्याला जे हवे ते करण्याऐवजी, आपल्याला जे हवे ते करतो. जेव्हा आपण येशूला आपल्या जीवनाचा पुढारी होण्यास सांगतो, आपण स्वःताला त्याच्या हातात दिले पाहिजे! आपण असे केले तर आपले जीवन कितीतरी चांगले असेल, आपण पतीत होण्याची संधी कमी असेल, शिवाय आपण शर्यतहि जिंकू! येशूला मुख्य पुढारी होऊ देऊ या!

## थंडावा दूर करणारा खेळ

**अभिवादन आणि प्रश्न वर्तूळे**







दोन वर्तूळ करा, एकामध्ये एक, चमूमध्ये सारखे विद्यार्थी असतील(वय किंवा उंचीचा काही प्रश्न नाही, तूम्ही विद्यार्थी मिसळवू शकता . जर तुमची इच्छा असेल तर हा खेळ वर्तूळाशिवाय सुध्दा खेळतो येतो . दोन वर्तूळ, संगित चालू असतांना, दोन विरूध्द दिशेला धावतात . जेव्हा संगित थांबते, तेव्हा सर्वजण त्याच्या समोरच्या भागीदारासोबत असतील, तो किंवा तिच्या, ते म्हणतील, "कसं काय" आणि आपले नाव घेतील आणि यापैकी एका प्रश्नाचे उत्तर देतील:




- तुमचे आवडते जेवण कोणते आहे?
- दुस-या धडयातील पवित्र शास्त्रातील ओवी तुम्ही म्हणू शकता काय?
- या व्हीबीएसमध्ये तूमची आवडती पवित्र शास्त्रातील व्यक्ती कोणती आहे?
- व्हीबीएस मध्ये तुम्हाला सर्वात जास्त काय आवडते?
- व्हीबीएस मध्ये तुम्ही एखाद्या नविन व्यक्तीला भेटला आहात काय? त्याचे किंवा तिचे नाव सांगा.

ही प्रक्रिया पुन्हा करा, संगित सुरू करा आणि दुसरी जोडी आली म्हणजे सुरू करा आणि एकमेकांना प्रश्न विचारण्यास सांगा.

## पवित्र शास्त्रातील धडा

**येशू आपले तारण करतो**



1. येशूचे मित्र घाबरले होते आणि दुःखी होते. आधीच्या रात्री, क्रोधीत गर्दीतील मनुष्यांनी येशूला अटक केली होती आणि ते त्याला घेउन गेले होते. येशूला मरणदंडाची शिक्षा देण्यात आली होती - जरी येशूने काही वाईट केलेले नव्हते

   *येशू शब्दाच्या वेळी, हाताच्या पंजाना विरूध्द हाताच्या मधल्या बोटाने स्पर्श करा.*

2. रोमी सैनिकांनी येशूला वधस्तंभ आपल्या पाठीवर वाहण्यास भाग पाडले, त्यांनी त्याला एवढे वाईट रीतीने मारले की तो चालू सुध्दा शकत नव्हता. जेव्हा ते वधस्तंभी खिळण्याच्या जागेवर आले तेव्हा शिपायांनी येशूला वधस्तंभी खिळले. शारीरीक वेदनांपेक्षा वाईट, लोक त्याच्यावर ओरडले, त्याच्यावर थुंकले आणि त्याला वाईट रीतीने वागवले. येशूने आपल्यावर एवढी प्रीती केली की त्याने वधस्तंभावर मरण पावेपर्यत आपल्याला पापापासून शुध्द करण्यासाठी सर्व जखमा सहन केल्या, जरी तो त्यांना थांबवू शकला असता. लवकरच अंधार पडला, जरी दिवस बराच उरला होता. त्यानंतर, भूमिकंप झाला आणि काही मिनीटांनी येशू वधस्तंभावर मरण पावला. ते भयानक होते.



   *वधस्तंभ शब्दाच्या वेळी तुमचा उजवा हात वाकवा आणि खाली करा, मग डावीकडून उजवीकडे न्या.*

3. येशू मरण पावल्यावर त्याला कबरेत पुरण्यात आले. तीन दिवसांनंतर, ब-याच स्त्रिया पहाटे कबरेवर गेल्या, त्याना कळून आले की भली मोठी धोंड जी कबरेवर ठेवण्यात आली होती ती एका बाजूला सरकवण्यात आली आहे. स्त्रियांना आश्चर्य वाटले!



स्त्रिया शब्दाच्या वेळी उघडलेल्या उजव्या हाताचा अंगठा हनूवटीला लावा आणि मग छातीवर लावा

4. स्त्रियांमधील एक स्त्री, मरीया, हिला रिकाम्या कबरेबाबत काय विचार करावा हे समजत नव्हते, म्हणून ती पेत्र आणि योहान यांना भेटण्यास धावत गेली, जे येशूचे दोन मित्र होते. जेव्हा तिने त्यांना सांगितले तेव्हा ते कबरेकडे धावत गेले. जेव्हा त्यांनी कबरेत प्रवेश केला तेव्हा त्यांना येशू दिसला नाही. शरीर कबरेमध्ये नव्हते! पेत्राला आणि योहानाला माहित नव्हते काय धडले आहे.




*कबर शब्दाच्या वेळी, पसरलेले हात खांद्यापासून खाली न्या, हात मध्यभागी जोडलेले ठेवा.*

5. मरीया, जी त्यांच्यामागे कबरेकडे आली होती, रडतच होती. जेव्हा ती कबरेमध्ये पुन्हा शिरली, तेव्हा कबर रिकामी होती, परंतु तेथे दोन देवदूत होते ज्यांनी तिला विचारले, "तू का रडत आहेस?" मरीयेने देवदूतांना उत्तर दिले, "कारण येशूचे शरीर येथे नाही." तिने त्यांना सांगितले. मला हे माहित नाही की त्यांनी येशूला कुठे नेले आहे. जेव्हा ती देवदूतांपासून निघून गेली, मरीया जवळ जवळ एका व्यक्तीवर अडखळलीच, परंतु तिला वाटले की तो बागेत काम करणारा एकजण आहे



*देवदूत या शब्दाच्या वेळी खांक्षवरील बोटांचा समोरचा भाग बाजूला न्या आणि त्यांना वर करा आणि खाली करा.*

6. मग तिने आवाज ऐकला, "मरीये". तिने तो आवाज ताबडतोब ओळखला - तो येशू होता. तो तेथे तिच्यासमोर होता, आणि तो जीवंत होता. येशूने तिला सांगितले की तिने दुस-यांना सांगावे, ती हर्षातिशयाने धावली, जोरात ओरडली, "येशू जीवंत आहे. मी त्याला पाहिले आहे आणि प्रत्येकजण आश्चर्यचकीत झाले. येशूने त्यांना आधी जे सांगितले होते ते खरे होते. देवाची योजना चांगली होती. नंतर, येशूने त्याच्या मित्रांना दर्शन दिले आणि ते त्याविषयी सर्वांना सांगू लागले, शुभवार्ता, की येशू जीवंत आहे



*जीवंत शब्दाच्या वेळी, अंगठे आणि समोरचे बोट विस्तारीत करा, हात शरीराकडे उंच करा*

.

शिक्षक: येशूला स्विकारण्यासाठी लेकरांना आमंत्रण देण्याची ही चांगली संधी आहे. त्यांना विचारा की ते येशूवर तारणार म्हणून विश्वास ठेवतात काय. त्यांनी प्रतिसाद द्यावा म्हणून त्यांना वारंवार चांगली संधी द्या, आणि मग तुमच्या मागे म्हणण्यासाठी त्यांना आमंत्रण द्या: "प्रभू येशू, माझा तारणारा म्हणून मी तुजवर विश्वास ठेवतो. मी जाणतो की मी तुजविरूध्द पाप केले आहे. मला तुझी आज्ञा पाळायची आहे आणि तूजवर आणि दुस-यांवर प्रेम करावयाचे आहे. मला माझे जीवन तुला द्यायचे आहे. तू माझा कर्णधार आहेत. कृपाकरून ये आणि माझ्या हृदयामध्ये वस्ती कर. आभार मानतो, प्रभू, आमेन ."







# चक्राकार स्थानके

**तीन गटामध्ये विभागणी करा आणि स्थानकांकडे जा**

## फराळ स्थानक



**पॉपकॉर्न कोन**

*घटक पदार्थ:*

- 1 मोठी पिशवी भरून पॉपकॉर्न
- 1 नारंगी रंगाचा कागद
- ग्लू स्टिक किंवा चिकट पट्टी

सूचना

1. कागद आयाताकृती दूमडा आणि उरलेला कागद कापून टाका, चैकोन तयार करा
2. वरील उजवा कोपरा खालील उजच्या कोप-यासोबत जोडा? कोपरे चिटकविण्यासाठी 2 सेंमीची मात्रा ठेवा.
3. बाकीचा कागद कापून कोन तयार करा.
4. कोनमध्ये पॉपकॉर्न भरा.

*तयार; आता शर्यतीचा आनंद घेण्याची वेळ आली आहे*

## गॅरेज हस्तकाम

**पदक**




प्रत्येक विद्यार्थ्याला वाटा:

1 कागद ज्यावर पदकाचे चित्र काढलेले आहे .

1 कागद जो खाली ठेवला जाईल आणि त्यावर पदक चित्र काढण्यात आले आहे.

प्रत्येक लेकराला थोडी थोडी चमकी द्या.

पदक:

- दोन गोलांची रूपरेषा चांगली कापा आणि ज्यावर टायरचे निशान आहे, काळजी घ्या की बाहेरचे लोंबणारे कागद कापले जाणार नाहीत, मग त्यांना रंग लावा
- चैकोनाची धार 90 डिग्रीमध्ये दूमडा
- थोडासा डिंक घेऊन, घारा चोकोनाच्या दुस-या बाजूला चिटकवा, गोलाच्या मागील बाजूला, दुस-या वर्तूळाबाबतहि तसेच करा, म्हणजे
- चमकीच्या कागदाने सुशोभित करा

तळ:


• तुमचा कागद छापलेल्या तळ कागदावर ठेवा, मध्यभागातून चैकोन कापा, टिंब असेलेला विभाग दूमडा आणि त्याला रंग लावा.

• लक्षात घ्या की कोप-यावर दोन चैकोन आहेत. त्यांना आतून जोडा आणि डिंकाने चिटकवा.

• शेवटी तुम्ही कापलेल्या ठिकाणी तुमचे पदक ठेवा.

## गाडी चालविण्याचा वर्ग

गाडी चालविण्याच्या वर्गामध्ये स्वागत आहे, ज्यामध्ये आपण विद्याश्र्यांच्या पुस्तकावर काम करणार आहोत. आजचा घडा आणि वचन म्हणून आपण सुरू करू या. चला तर मग करा सुरू.




| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तु | अ | वि | तु | छे | ये | शू | ब्ध |
| म्हां | म | चा | श्वा | म्हां | त्र | अ | पं |
| ला | ता | [illegible] | ण | स | ला | ण | ब्ध |
| पु | त्र | ले | पा | क | पा | ल | यो |
| शू | र्थ | पं | ली | पा | [illegible] | ज | हा |
| छे | अ | का | ब्ध | उ | [illegible] | ग | ना |
| ला | वं | क | प्रा | छे | ध | ला | चे |
| सा | श्वा | ळा | र्थ | ण | स्तं | स्व | र्ग |
| वं | का | वे | ना | उ | भ | ल | ब्ध |


आज तुम्ही गोष्टी लक्षपूर्वक ऐकली काय? धडयातील तुम्ही विचार करू शकता ते सर्व शब्द 1 मिनीटात लिहा.

शिक्षकः जो सर्वात ज्यास्त शब्द लिहील तो विजेता ठरेल. पर्यायी, त्यांना इतर मुलांनी सांगितलेले शब्द खोडायला लावा आणि ज्याच्याकडे सर्वात ज्यास्त शब्द उरतील तो विजेता ठरेल.

येशू, वधस्तंभावर खिळणे, वधस्तंभ, तारण, पाप, ओरड, श्वास घेणे, खिळे, आरोप







## प्रश्न आणि उत्तरे

1. अनंतकाळ म्हणजे काय? आपण सदासर्वकाळ जगू हे कसे शक्य आहे?

सार्वकालीकतेमध्ये, वेळ असणार नाही. ते मरणानंतरचे अमर्यादीत जीवन राहील. पवित्र शास्त्र सांगते की आपण सार्वकालीक आहोत, की आपण स्वर्गामध्ये किंवा नरकामध्ये नेहमीसाठी जीवंत राहणार आहोत. त्याचा अर्थ असा सुध्दा आहे की आपण पृथ्वीवर दुसरी व्यक्ती किंवा जीवंत प्राणी म्हणून वापस येणार नाही, जसा काही लोक विश्वास ठेवतात. परंतु जेव्हा आपण मरण पावतो तेव्हा आपण नेहमीसाठी पृथ्वी सोडतो.

2. सर्वजण येशूवर विश्वास का ठेवत नाहीत?

देवाने मानवजातीला विश्वास ठेवावा किंवा ठेवू नये याबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले आहे, कारण त्याची इच्छा आहे की आपल्याला स्वतंत्र इच्छा असावी आणि आपण यंत्रमानवासारखे कुठलाहि पर्याय नसणारे असू नये. काही लोकांनी येशूबाबत पुरेसे ऐकले नाही, त्यामुळे विश्वास ठेवणे म्हणजे काय हे त्यांना समजत नाही. दुस-यांनी ऐकले आहे आणि निर्णय घेतला आहे की आपण विश्वास ठेवू नये आणि येशूला अनुसरू नये. पुष्कळ लोकांनी येशूवर विश्वास ठेवला नाही कारण मग त्यांना त्यांच्या जीवनामध्ये बदल करावा लागेल, जो त्यांना करावयाचा नाही.

3. देव आपल्यासोबत कसा बोलतो? तुम्हाला देवाने सांगितलेली शेवटची गोष्ट कोणती होती?

देव आपल्यासोबत त्याचा शब्द, पवित्र शास्त्र, यामधून बोलतो. असे वाटते की "वचने" पानातून उडी मारतात आणि ठराविक वेळी आपल्यासमोर येतात. देव लोकांचा सुचना देणारे म्हणून उपयोग करून घेवू शकतो, पाळक आणि शिक्षक यांचा तुमच्यासोबत बोलण्यासाठी उपयोग करून घेतो. देव तुमच्यासोबत सरळ सरळहि बोलतो जेव्हा तुम्हाला जोरदारपणे वाटते की तुम्ही थांबावे आणि कोणाची तरी मदत करावी किंवा ठराविक परिस्थिती टाळावी, व्यक्ती किंवा रस्ता टाळावा.

4. येशू मरण पावण्यापूर्वी जगात काय घडले?

आधीच अंधार पडला आणि भूमिकंप झाला.

5. ते कोणते शिष्य होते जे पहिल्यांदा येशूच्या कबरेत गेले आणि त्यांनी पाहिले की येशू तेथे नाही?

पेत्र आणि योहान

## तयार, तत्पर, खेळ

**जळालेले (चमू)**

चिन्हांकित करा 15 ग 15 चा एक चोकोन तयार करा. लेकरांना 4 चमूमध्ये वेगळे करा, त्यांची संख्या सारखी ठेवा. प्रत्येक चमू त्यांच्या बाजूच्या चैकोनामध्ये उभी राहाते. प्रत्येक लेकराला नंबर नेमून द्या. उदाहरणार्थ, प्रत्येक चमूतील एकाला 1 नंबर देण्यात येईल, दुस-याला 2 नंबर देण्यात येईल इत्यादी. चैकोनाच्या मध्यभागी चेंडू ठेवा. खात्री करा की तो जरा नरम आहे कारण लेकरांना चेंडूने मारण्यात येणार आहे. शिक्षक सहजपणे एक एक नंबर सांगतील आणि प्रत्येक चमूतील मुले ज्यांना तो नंबर देण्यात आला आहे, चैकोनाती मध्यभागी ठेवलेल्या चेंडूकडे धाव घेतील. ज्याला चेंडू प्रथम मिळेल आणि जो तो चेंडू पहिल्यांदा उचलेल तो आपल्या चमूसाठी गूण घेईल. नंतर ते आपल्या चैकोनातील कोप-यातून दुस-या संघातील खेळाडूंना चेंडू फेकून मारतील. जर ते यशस्वी झाले तर









त्यांना त्यांच्या चमूसाठी दुसरा गूण मिळेल. पहिल्या फंकीनंतर, चोकोनातील चार लेकरे चेंडूच्या गागे धावणे सुरू ठेवतील आणि विरूध्द चमूतील लेकरांना चेंडू फेकून मारतील. त्यासाठी 5 ते 7 सेकंद द्या.
जेव्हा वेळ संपेल, तेव्हा लेकरे चेंडू मध्यभागी ठेवतील आणि आपल्या चमूमध्ये वापस जातील. शिक्षक दुसरा नंबर सांगतील आणि खेळ पुन्हा सुरू होईल.
विजयी चमू कोणती आहे हे समजण्यासाठी गूणनोंदणी करीत राहा

**खरे/खोटे (व्यक्तीगत)**

खोलीमध्ये किंवा जमिनीवर क्षेत्र तयार करा. एका बाजूला खरे आणि दुस-या बाजूला खोटे म्हणण्यात येईल.
व्हीबीएसच्या धडयातून खरे आणि खोटे वाक्ये आधीच तयार करा आणि पवित्र शास्त्रातील अलग अलग ध्येयवचने आधीच तयार करा. खेळामध्ये धडयातील गोष्टींचा उल्लेख करा. जर विद्याथ्र्यांना वाटेल की वाक्य खरे आहे तर ते खरे बाजूला जातील, किंवा जर त्यांना वाटेल की वाक्य खोटे आहे तर ते खोटे या बाजूला जातील. जे लेकरे उत्तरे चूकीचे देतील त्यांना खेळ सोडावा लागेल. जो मुलगा उभा राहिलेला सापडेल तो विजयी ठरेल.




# निष्कर्ष

आपला व्हीबीएसचा वर्ग किती छान होता! पूर्ण आठवडाभर आपल्याला खूप गंमत आली, आपण शिकलो की इंजिनमध्ये तेल कसे टाकावे, जेव्हा आपण पापे कबूल करतो, चांगले टायर्स कसे टाकावे, त्यांना देवाचे वचन पाळण्याची पक्कड कशी असावी, गाडीमध्ये थंडावा निरोधक संयंत्र कसे टाकावे, दुस-यांच्या जीवनामध्ये प्रीती टाकण्यासाठी स्वारस्य कसे दाखवावे आणि तसेच पेट्रोलप्रमाणे कोठेहि जाण्यासाठी येशूचे सामथ्र्य आपल्याकडे केसे असावे. आज सर्वात उत्तम भाग होता: आपण शिकलो की येशू आपला कर्णधार आहे! आजपासून आपण त्याला आपल्या अंतःकरणामध्ये येण्यासाठी स्विकारले, त्याने आपले मार्गदर्शन करावे आणि आपल्या उरलेल्या जीवनामध्ये आपल्याला जे काही लागते ते पुरवावे, आपल्याला वाट दाखवावी आणि तारणाची देणगी द्यावी, यासाठी की आपण त्याच्यासोबत सार्वकालीक जीवनामध्ये राहावे! आपल्याला जिंकण्यासाठी शर्यत आहे. आपण येशूसोबत अति वेगाने जावू या!